मे, २०२५

# आपलं मंत्रालय

## एक सुसंवाद













अतिथी संपादक

**व्ही. राधा**

अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन




# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रेरणेतून मिळेल विकासाची नवी दिशा!

- चौंडी येथील स्मृतिस्थळाचा तीर्थस्थळ विकास आराखड्यात समावेश, यासाठी ६८१.३२ कोटी रुपयांचा निधी मंजूर; आणखी ७ तीर्थस्थळांचा विकास प्रस्तावित
- ऐतिहासिक जलस्रोतांच्या जतन व संवर्धनासाठी ७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर; आणखी ३४ जलस्रोतांचे पुनरुज्जीवन व सुशोभीकरण करून इतिहासाला नवसंजीवनी देण्यात येणार
- अहिल्यानगर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अत्याधुनिक रुग्णालयाची स्थापना करण्यात येणार; १०० विद्यार्थी क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय व ४३० खाटांचे रुग्णालय लवकरच उभारण्यात येणार
- धनगर समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठीच्या वसतिगृह योजनेचे नामकरण 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृह योजना' असे करण्यात येणार
- नारी शक्तीचा जागर करण्यासाठी, महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी 'आदिशक्ती अभियान' आणि 'आदिशक्ती पुरस्कार योजना' राबविणार
- अहिल्यानगर येथे मुलींसाठी विशेष शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करणार
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित बहुभाषिक चित्रपटाची निर्मिती करण्यात येणार

**पुण्यश्लोक**
**अहिल्यादेवी होळकर**
**यांना त्रिशताब्दी जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !**







**एकनाथ शिंदे**
उपमुख्यमंत्री

**अजित पवार**
उपमुख्यमंत्री

**नरेंद्र मोदी**
प्रधानमंत्री

**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन**
www.mahasamvad.in | MaharashtraDGIPR | MahaDGIPR

## ८ जपानवारी



कोणत्याही देशाची 'विकसित देश' अशी ओळख ही तिथल्या तंत्रज्ञान आणि उद्योगधंद्यामुळे जितकी असते, तितकीच ती तिथल्या लोकांची मूल्ये, वैयक्तिक आणि सार्वजनिक शिस्त, कर्मशीलता अशा गुणांमुळेसुद्धा होत असते. 'जपानवारी'च्या अनुभवातून मला ही ओळख झाली.

## १० सुलेखन मालिका (कॅलिग्राफी) भाग-१

कलात्मक सुलेखनासाठी विशिष्ट पेन आणि कागद याची आवश्यकता असते. देवनागरी लेखनात ४५ अंशाचा कोन हे या लिपीचे मुख्य वैशिष्ट्य आहे. याकरिता वेगळी लेखणी वापरण्यात येते.

## १६ आत्मा : मनाच्या पलीकडे

आत्मा हे एक विश्वव्यापी तत्त्व आहे. ते अविनाशी आहे. पंचमहाभूतांनी बनलेल्या शरीरात या तत्त्वामुळेच निर्माण होतं चैतन्य. आत्मतत्त्व नित्यनूतन असतं. ते स्वयंभू आहे. ते येत नाही अन् जात नाही, केवळ असतं. ते सतत गतिशील असल्याने ही संज्ञा मिळाली आहे. परमात्मा आणि जीवात्मा हे त्याचे दोन पैलू, तत्त्वज्ञानात त्यास 'आत्मन' म्हणतात.

## १८ सृजननिष्ठांची मांदियाळी मनोरंजनविश्वाची मुंबईवारी

भारताचं आणि सृजनाचं अतूट नातं आहे. आपल्याला अनेक वर्षांचा सृजनाचा वारसा लाभला आहे. भारतीय परंपरेत कला आणि साहित्याची निर्मिती प्राचीन आहे. स्थापत्य कला, संगीत आणि नृत्य, लोकसाहित्य, विज्ञान, लोककला, चित्रकला, दृक्श्राव्य माध्यमं या सर्व घटकांनी सृजनशीलतेला वाव दिला.

## २७ विपश्यना

निरोगी शरीर आनंदी आयुष्याचा पाया आहे. निरोगी शरीरास निरोगी मनाची आवश्यकता असते. निरोगी मनात जीवनाचा निखळ आनंद प्राप्त करण्याची क्षमता असते.

## ३० शिवराज्याभिषेक दिन मराठा साम्राज्याचा गौरवशाली अध्याय

राज्याभिषेक प्रसंगी रायगड किल्ला विविध तालवाद्यांच्या निनादाने, शंखध्वनी, तुतारीनादांनी, जयजयकारांनी आणि मावळ्यांच्या जल्लोषाने निनादला होता. अठरापगड मावळा आपल्या राजांचे दर्शन घेण्यासाठी आसुसला होता. सह्याद्रीच्या कुशीत गुंजणाऱ्या त्या घोषात एक नवा भारत, नवे राजकीय तत्त्वज्ञान आणि स्वराज्य जन्माला येत होते.

## ३१ मंत्रालयात भरली




प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी, त्यांच्यात प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्यासाठी टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग विक ५ ते ९ मे दरम्यान मंत्रालयात साजरा करण्यात आला. 'टेक वारी' म्हणजे महाराष्ट्र शासन आयोजित पहिली 'डिजिटल वारी' होय.


| | |
|---|---|
| दि ग्रेट इंडियन किचन | ६ |
| कर्मयोगी भारत | ७ |
| जपानवारी | ८ |
| सुलेखन मालिका (कॅलिग्राफी) भाग-१ | १० |
| तारे जमीन पे | १२ |
| उद्योजकतेचा कॅलिडोस्कोप | १३ |
| आदर्श स्त्री नेतृत्वाला वंदन! | १५ |
| आत्मा : मनाच्या पलीकडे | १६ |
| मी... | १७ |
| सृजननिष्ठांची मांदियाळी मनोरंजनविश्वाची मुंबईवारी | १८ |
| मनाला हुरहुर लावणारी ती पत्रे..! | २२ |
| व्यक्ती आणि अजून काही वल्ली | २४ |
| वेगळ्या वाटा | २५ |
| विपश्यना | २७ |
| निसर्गोपचार एक समग्र उपचार पद्धत | २९ |
| शिवराज्याभिषेक दिन मराठा साम्राज्याचा गौरवशाली अध्याय | ३० |
| मंत्रालयात भरली टेक वारी | ३१ |
| आपले खरे स्वरूप-प्रेम | ३५ |
| गुणवंत अधिकारी/कर्मचारी गौरव | ३६ |
| राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) | |
| अभियान व स्पर्धा | ३७ |
| पाक कला | ३८ |

वर्ष ३ रे । अंक २ । मे, २०२५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

आपलं मंत्रालय

## संपादन

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संकल्पना, मुखपृष्ठ — अजय भोसले
- व्यवस्थापकीय संपादक — हेमराज बागुल
- संपादक — केशव करंदीकर
- सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.
Email : aaplemantralay@gmail.com

फॉलो करा...www.twitter.com&MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com&dgipr

**प्रतिक्रियांचे स्वागत**

आपलं मंत्रालय या नियतकालिकाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आणि सूचनांचे स्वागत आहे.

**'आपलं मंत्रालय' नियतकालिक ही गृहपत्रिका असून या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.**

# पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या तेजस्वी कार्याला अभिवादन : मुख्यमंत्री

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त लोकमाता अहिल्याबाई होळकर: ॲन इटरनल फ्लेम या Coffee Table पुस्तकाच्या प्रकाशनाचा कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य अनमोल असून त्यांचे जीवन म्हणजे लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श नमुना आहे.




मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी संपूर्ण देशभरात मंदिरांचे पुनर्निर्माण, घाटांची उभारणी; तसेच विहिरी, तलाव, पाणवठे यांची निर्मिती करून जनतेच्या मूलभूत गरजांकडे लक्ष दिले. राज्य शासनामार्फत त्यांच्या या ऐतिहासिक कार्याचा ठसा कायमस्वरूपी राहावा, यासाठी संबंधित ठिकाणांचे संवर्धन करण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले.

सोशल स्टडीज फाऊंडेशन निर्मित या ग्रंथामध्ये अहिल्यादेवींनी केलेल्या कार्याचे बहुआयामी दर्शन घडते. केवळ माहितीपर दस्तऐवज म्हणून नव्हे, तर हा ग्रंथ आपल्या संस्कृतीचा अमूल्य ठेवा असून, सर्वसामान्यांपर्यंत अहिल्यादेवींचे कार्य आणि मूल्ये पोहोचवण्याचे कार्य या माध्यमातून साधले गेले आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात केंद्रीय महिला व बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनीही उपस्थित राहून आपले विचार मांडले. त्यांनी स्पष्ट केले की, काशी, अयोध्या, सोमनाथ यांसारख्या प्रमुख धार्मिक स्थळांच्या पुनर्विकासात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे ऐतिहासिक योगदान आहे. 'इटरनल फ्लेम' या ग्रंथात त्यांच्या नेतृत्वगुणांचा सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे.

अहिल्यादेवींना इतिहासात 'प्रगतिशील राणी' म्हणून ओळखले जाते. त्यांचे कार्य, व्यवस्थापन कौशल्य आणि निर्णयक्षम नेतृत्व आजही मार्गदर्शक ठरते. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन शासन आणि समाज पुढे जात आहे, असे मा. अन्नपूर्णा देवी यांनी नमूद केले. हा प्रकाशन सोहळा म्हणजे केवळ एका पुस्तकाचे विमोचन नसून, राष्ट्रासाठी प्रेरणास्थानी ठरलेल्या एका तेजस्वी जीवनाचे सामूहिक स्मरण आणि अभिवादन होते.

# नव्या वाटा, नव्या दिशा...

मे महिन्याचे आगमन पावसाच्या सरींनी झाले आहे. ऋतू बदलले आहेत. खरंतर जून महिन्यात पर्यावरण दिवस साजरा केला जातो. जणूकाही मे महिन्यात बरसलेल्या पावसाच्या सरी पर्यावरणाची आठवण करून देत आहेत. पावसाच्या अवचित सरी, हवामानातील बदल, पर्यावरणाची नाजूक समतोलता आणि तिच्याशी असलेलं आपलं नातं अधिक खोलात जाणवायला लावतं. ऋतूंचे हे बदल हे केवळ हवामानाचे नव्हे, तर सामाजिक आणि प्रशासकीय जगतात घडणाऱ्या बदलांची प्रतीकं ठरतात. असे अवचित येणारे बदल नव्या बदलांशी सामना करण्याची उर्मी आपल्यात निर्माण करतात. नव्या परिप्रेष्यातून आपण समस्येकडे पाहू लागतो, नवे मार्ग शोधू लागतो. नव्या वाटांसाठी नव्या दिशा शोधाव्या लागतात.



**व्ही. राधा**
अपर मुख्य सचिव,
सामान्य प्रशासन विभाग

आजच्या काळात बदल ही अपरिहार्य बाब झाली आहे; किंबहुना तो निसर्गाचा स्थायीभाव आहे. मात्र, या बदलांचा स्वीकार करत नव्या वाटा शोधण्याची तयारी ठेवणं, ही खऱ्या अर्थानं आधुनिक आणि सृजनशील प्रशासनाची ओळख ठरते. जुन्या साच्यांमध्ये अडकून राहणं म्हणजे गतकाळाच्या मर्यादांमध्ये स्वतःला बांधून घेणं. नव्या दिशांचा स्वीकार म्हणजे भविष्यकाळातल्या दालनांची कवाडं खुली करणं.

शासकीय कामकाजदेखील या बदलांच्या प्रवाहातून सुटलेलं नाही. तंत्रज्ञानाच्या प्रचंड वेगाने होत असलेल्या प्रगतीने पारंपरिक कार्यपद्धतींना नवे आव्हान दिले आहे. याच अनुषंगाने मंत्रालयात नुकताच संपन्न झालेला टेक-वारी महातंत्रज्ञान प्रशिक्षण सप्ताह हा उपक्रम उल्लेखनीय ठरतो. तंत्रज्ञानाच्या भीतीवर मात करत, नव्या साधनांचा प्रभावी वापर कसा करता येईल, हे जाणून घेण्यासाठी 'टेक-वारी'ने एक महत्त्वपूर्ण मंच उभा केला.

टेक वारीच्या यशानंतर लवकरच टेक मंगळवार, टेड टॉक हे दोन अभिनव उपक्रम सुरू केले जाणार आहेत. या उपक्रमात तज्ज्ञांनी कर्मचाऱ्यांना नव्या युगातील डिजिटल साधनांचा आत्मविश्वासाने वापर करण्यासाठी प्रेरित केलं. 'कर्मचारी ते कर्मयोगी', 'रुलबेस ते रोलबेस' या तत्त्वावर मिशन कर्मयोगी उपक्रम अंतर्गत आयगॉट कर्मयोगी या २४ x ७ ऑनलाइन प्रशिक्षण प्लॅटफॉर्मची उपलब्धता म्हणजे शिक्षणाचा खऱ्या अर्थाने समावेशक आणि निरंतर मार्ग.

आयगॉट प्रशिक्षण अभ्यासक्रम संकेतस्थळावर; तसेच भ्रमणध्वनी उपयोजकांवर उपयोजकांवर सुद्धा उपलब्ध आहे. त्यामुळे वेळेच्या व्यवस्थापनाचाही प्रश्न नाही. अनेकांनी ते रेल्वेच्या प्रवासाचा वेळ प्रशिक्षणासाठी उपयोगात आणत असल्याचे सांगितले.

महाराष्ट्राने iGOT प्लॅटफॉर्मवर अंदाजे ५ लक्ष वापरकर्ते जोडले आहेत. राज्याने एकूण १८.२५ लाख अभ्यासक्रम नोंदणी आणि ११.९३ लाख अभ्यासक्रम पूर्ण केल्याची नोंद केली आहे. ज्यामुळे एकूण अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या बाबतीत ते भारतातील तिसऱ्या क्रमांकाचे सर्वोच्च कामगिरी करणारे राज्य आहे.

या अंकामध्ये टेक-वारी, आयगॉट कर्मयोगी, वेव्हज् यांसारख्या नव्या प्रयत्नांचा आढावा घेणारे लेख आहेत. याचबरोबर कविता, पाककला, पर्यटन, ललित लेख, सुलेखन मालिका या विषयावरील वैविध्यपूर्ण लेखांची गुंफण वाचन अनुभव समृद्ध करतो. या महिन्यापासून सुलेखन (कॅलिग्राफी) चे सदर सुरू करण्यात येत आहे. त्यात सुलेखनावर आधारीत संपूर्ण माहिती देण्यात येईल. सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी त्याचा लाभ घ्यावा.

'आपलं मंत्रालय' हे केवळ माहितीपर मासिक नसून, ते शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सर्जनशील अभिव्यक्तीचे हक्काचे व्यासपीठ आहे. प्रशासकीय जबाबदाऱ्यांमधून उभ्या राहणाऱ्या विचारधारा, निरीक्षणं, अनुभव हे केवळ व्यवस्थापनापुरते मर्यादित न राहता, यामुळे नव्या धोरणांची बीजंही रोवता येतात, हे या उपक्रमातून वेळोवेळी सिद्ध झाले आहे.

आज आपण नव्या वाटेवर उभं आहोत. समोर नव्या दिशा आहेत. काही ज्ञात काही अज्ञात. त्या दिशांना स्वीकारण्यासाठी, नव्या वाटांवर चालण्यासाठी प्रत्येकाला स्वतःच्या मनातील संकोच झुगारावे लागतील. आपण बदलांना सामोरे गेलो तरच आपण पर्यावरणस्नेही, लोकाभिमुख आणि तंत्रस्नेही प्रशासन घडवू शकतो. म्हणूनच लिहिते व्हा, व्यक्त व्हा. आपल्या विचारांना दिशा द्या. 'आपलं मंत्रालय' हे आपले माध्यम आहे. ते जपू या, समृद्ध करू या! आपलं मंत्रालयाच्या नवीन वाटचालीस खूप खूप शुभेच्छा!

**व्ही. राधा**
(अतिथी संपादक)

# दि ग्रेट इंडियन किचन

**प्रशांत साजणीकर**

सकाळी ती उठते.... निवडते, सोलते, चिरते, कापते, किसते, वाटते, मळते, लाटते, तळते, शिजवते आणि त्याला वाढते....

सकाळी तो उठतो... फासफुस करत कपालभाती आणि योग करतो... आंघोळ करून टेबलावर नाश्ता करायला येतो. आवरून, तिने केलेला डबा घेऊन कामाला जातो. संध्याकाळी थकून येतो. तिने वाढलेलं ताजं जेवण जेवतो. दिवसभराच्या रहाटगाडग्यातून ती थकलेली आहे त्याचं त्याला काहीच देणघेणं नसतं.

ती ताटात राहिलेलं खरकटं गोळा करते, ते वेगळं करते, भांडी, ताटं, वाट्या धुते, धुतलेली भांडी नीट लावून ठेवते, तुंबलेलं सिंक हात घालून साफ करते, ओटा घासून पुसून लखलखीत करते आणि थकून झोपी जाते.

भारतातल्या बहुतांश घरातली आणि त्याहूनही स्वयंपाकघरातली ही सार्वत्रिक स्थिती आहे. सकाळी उठल्यावर हात धुऊन तिच्या मागे लागणारं स्वयंपाकघर दिवसभर नव्हे जन्मभर (२४/७ आणि ३६५ दिवस) सुटत नाही.

प्रत्येक घरामध्ये अविभाज्य असलेलं असं हे किचन किती कंटाळवाणं आणि त्रासदायक असू शकतं, याचं अगदी प्रत्ययकारी आणि चपखल चित्रण दिग्दर्शक Jeo Baby यांनी The Great Indian Kitchen मध्ये केलं आहे. Jeo Baby यांनी त्यांच्या प्रत्यक्ष जीवनात जेव्हा त्यांच्या पत्नीला हातभार लावावा म्हणून स्वयंपाकघरातल्या कामात थोडा हातभार लावायला सुरुवात केली, तेव्हा त्यांना स्वयंपाकघरातल्या रोजच्या कंटाळवाण्या कामाची जाणीव झाली.



Jeo Baby म्हणतात केवळ पुरुष असल्याने मी यातून माझी स्वतःची सुटका करूनही घेऊ शकलो असतो; पण देशातल्या कोट्यवधी महिलांचं काय? त्यांना हा पर्याय आहे का? त्यांच्या मते स्वयंपाकघर हा स्त्रियांचा एक प्रकारचा तुरुंगच आहे आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे घरातल्या बहुतांश पुरुषांना याची जाणीव असणे दूरच; पण ते या कामाची साधी दखलसुद्धा घ्यायला तयार नसतात. एखाद्या मित्राच्या घरी जेवायला यायचं निमंत्रण आलं की, Jeo Baby केवळ त्या घरातल्या स्त्रियांना होणाऱ्या त्रासाचा विचार करून तिथे जाणं टाळतात.

The Great Indian Kitchen मध्ये या स्वयंपाकघरातल्या कामाचं इतकं इत्यंभूत चित्रण केलंय आणि ते पुन:पुन्हा दिसत राहतं हे पाहून प्रेक्षकांनाही कंटाळवाणं होतं. नेमकं हेच दिग्दर्शकाला दाखवून द्यायचं आहे की, जर तुम्हाला हे पाहणंसुद्धा त्रासदायक होत असेल, तर तिला ते प्रत्यक्ष करताना किती कंटाळवाणं होत असेल?

फक्त शिक्षण घेणं आणि पैसे कमवणं म्हणजे स्त्री स्वावलंबी झाली, असं समजणं चुकीचं आहे. केवळ स्त्री असल्यामुळे तिला 'चूल-मूल' या जबाबदाऱ्यांतून मुक्ती मिळत नाही. विशेषतः 'चूल' म्हणजे स्वयंपाकघर ही जबाबदारी खूप मोठी आणि क्लिष्ट असते. फक्त स्वयंपाक करणं नव्हे, तर किराणा आणणं, भाजी, दूध, दळणं, साठवण, निवडणं, धुणं, आणि योग्य नियोजन हे सगळं त्यात येतं. जेवण पानात येण्याआधीचा हा सगळा मागचा प्रवास अनेकांना कळतही नाही.

याची एक दुसरी महत्त्वाची बाजू अशी की, एखाद्या स्त्रीच्या स्वयंपाकघरातल्या कामांना पर्याय म्हणून ही दुसरी स्त्रीच उभी राहते. तिला बरं नसेल तर घराची जबाबदारी घ्यायला दुसऱ्या एखाद्या स्त्रीचाच विचार केला जातो. घरातल्या पुरुषांनी घरातल्या स्त्रीच्या कामाची जबाबदारी उचलली आहे, असे अभावानेच पाहायला मिळते. सहज एखाद्या मित्र मैत्रिणींच्या कुटुंबात जेवायला जेव्हा बोलावले जाते, तेव्हाही सगळे पुरुष बाहेर गप्पा मारत बसणार आणि सगळ्या स्त्रिया स्वयंपाकघरात अशीच विभागणी होते. स्त्रिया गप्पा मारत बसल्यात आणि पुरुष स्वयंपाक घरात आहेत असं कधीच होत नाही.

दिग्दर्शक Jeo Baby यांचं दिग्दर्शन अप्रतिम आहे. माजघरातल्या अगदी साध्या साध्या गोष्टी त्यांनी कॅमेऱ्यातून फार विलक्षणरीत्या टिपल्या आहेत. रूढी परंपरा आणि स्त्रीची मासिक पाळी आणि याकडे पाहणारा कर्मठ समाज या विषयालाही चित्रपट स्पर्श करतो. सर्व कलाकारांचे अभिनय अप्रतिम आहेत. दिग्दर्शकाने अनेक प्रसंगात ठोकळ संवाद न लिहिता कलाकारांच्या उत्स्फूर्ततेवर जास्त भर दिला आहे. मुख्य भूमिकेत निमिषा साजयनने जान ओतली आहे. पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रातिनिधिक चेहरा म्हणून सूरज वेण्जारामूडू याने सुंदर साथ दिली आहे.

चित्रपट मल्यालम आहे. त्या अर्थाने ही गोष्ट केरळमधली आहे जिथे १०० टक्के स्त्रिया साक्षर आहेत. स्त्रीप्रधान संस्कृती हे वैशिष्ट्य असणाऱ्या केरळमधल्या स्त्रीची जर ही व्यथा असेल, तर उत्तर भारतात काय परिस्थिती असेल याची कल्पनाच केलेली बरी.

या चित्रपटात कोणत्याही पात्रांना नाव नाही, कारण ही प्रत्येक स्त्रीची प्रतिनिधिक कथा आहे, हे दिग्दर्शक दाखवतो. नायिका सुशिक्षित असून तिला नृत्याची आवड आहे; पण तिच्या इच्छा कधीच महत्त्वाच्या मानल्या जात नाहीत. तिला गोड बोलून तिच्या अपेक्षांविरुद्ध वागवलं जातं.

चित्रपटात कुणी खलनायक नाही; पण पुरुषप्रधान व्यवस्था हीच खलनायक आहे. शेवट विचार करायला लावतो.

हा चित्रपट प्रत्येक स्त्रीने जरूर पाहावा आणि प्रत्येक पुरुषाने – कारण त्याच्या आयुष्यात कोणत्या ना कोणत्या रूपात स्त्री आहेच. घरात मदत करावीच; पण किमान तिच्या कष्टांची जाणीव झाली तरी चित्रपटाचं खरं यश ठरेल.

*(चित्रपट ॲमेझॉन प्राईमवर उपलब्ध आहे.)*

**(सहसचिव, सहव्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र शासन)**

# कर्मयोगी भारत

**अजय भोसले**

कर्मचारी नव्हे, तर कर्मयोगी होण्यासाठी घेतलेला ध्यास म्हणजे मिशन कर्मयोगी. आयगॉट कर्मयोगी (iGOT karmyogi) हा सरकारी अधिकाऱ्यांच्या निरंतर प्रशिक्षणातून क्षमता विकसित करण्यासाठी मिशन कर्मयोगी धोरणांतर्गत निर्माण केलेला एक विशेष online उपक्रम आहे.

**उद्देश** – निरंतर शिक्षण आणि विकासाद्वारे नागरी सेवेत परिवर्तन घडवून आणणे.

निरंतर प्रशिक्षणातून शासकीय अधिकारी / कर्मचारी यांची कौशल्ये /ज्ञान विकसित करणे.

**संरचना** – 'कर्मयोगी भारत'ची स्थापना कंपनी act च्या कलम ८ खाली ना नफा तत्त्वावर २०२२ मध्ये झाली आहे. कंपनीचे संचालक मंडळ; तसेच कर्मयोगी टीमच्या माध्यमातून संकेतस्थळावर विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. विविध तज्ज्ञ संस्था मिशन कर्मयोगीच्या या अभियानात सहभागी आहेत. उदा. प्रशासकीय संस्था, नवी दिल्ली, म्हैसूर, मिटी विद्यापीठ, नॉयडा, वर्ल्ड बँक, आर्ट ऑफ लिविंग, आयआयटी इ. हा अभ्यासक्रम संकेतस्थळावर; तसेच भ्रमणध्वनी उपयोजकावर उपलब्ध आहे.



संकेतस्थळ (www.igotkarmyogi.gov.in) शासकीय अधिकारी /कर्मचारी यांच्यासाठी या संकेतस्थळावर सद्य:स्थितीत २,४३५ अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. खालील सहा अभ्यासक्रम सरकारी अधिकारी/ कर्मचारी यांच्यासाठी अनिवार्य आहेत.

१) Prevention of Sexual Harrssment of Women at Workplace
२) Code of Conduct for Government Employees
३) Introduction to Emerging Technologies
४) Orientation Module on Mission Life
५) Stay safe in Cyber Space
६) Yoga Break at workspace

## कर्मयोगी व्यासपीठ (karmyogi Hub)

कर्मयोगी संकेतस्थळावर खालीलप्रमाणे सहा व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ज्यात शिकण्याबरोबर चर्चा करण्याची तसेच करिअरची सुविधाही आहे. या सुविधा व्यक्तिमत्त्व विकासासाठी पूरक आहेत.

१) शिका व्यासपीठ (learn hub )
२) चर्चा व्यासपीठ (Discuss hub)
३) जोडा व्यासपीठ (network hub)
४) तज्ज्ञता व्यासपीठ (competency Hub)
५) व्यवसाय व्यासपीठ (career Hub)
६) क्षमता व्यासपीठ (competency )

## अभ्यासक्रम नेमके कसे शोधावेत?

१) तुम्हाला हव्या असलेल्या अभ्यासक्रमाचे नाव शोध इंजिनात प्रविष्ट करून;

२) शिका (learn) या tab मध्ये जाऊन इथे तुम्ही पाच प्रकारे तुम्हाला हवा असलेला अभ्यासक्रम शोधू शकता. १. तज्ज्ञतेनुसार २. सहभागी संस्थांचे अभ्यासक्रम ३. एकत्रित अभ्यासक्रम ४ एम.डी.ओ. चॅनेल ५. कर्मा प्रोग्रॅम

याशिवाय अमृत ज्ञानकोश या टॅबखाली विज्ञान, कृषी, इकॉनॉमी, प्रशासन अशा विविध क्षेत्रातील माहितीपूर्ण अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

धोरण, संशोधन, डिझाईन यासंबंधी विशिष्ट विषयातील अभ्यासक्रम अपेक्षित असल्यास ते तुम्हाला कॉम्पिटन्सी हबमध्ये शोधता येतील. डी.ओ.पी.टी., प्रशासकीय सस्था, नवी दिल्ली, म्हैसूर इ. संस्थांनी निर्माण केलेले अभ्यासक्रम प्रोवायडर या टॅबमध्ये पाहता येतील. क्युरेटेड कलेक्शनमध्ये विविध मॉड्युलचे एकत्रित अभ्यासक्रम समाविष्ट असतात. तर एमडीओ चॅनेलमध्ये विविध राज्यासंबंधी माहिती असते. कर्मा प्रोग्राम अंतर्गत अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर तुम्हाला ५ गुण मिळतात.

## काय आहे कर्मा गुणांकन?

कर्मा गुणांकनाचा उद्देश सरकारी कर्मचारी अभ्यासक्रमाशी किती जोडलेला आहे हे पाहणे आहे. यामुळे तुम्हाला तुमची प्रगती पाहता येते. सर्वाधिक कर्मा गुणांकन प्राप्त करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव संकेतस्थळावर झळकत असते.

कर्मयोगी मिशन अंतर्गत निर्माण केलेले सर्व अभ्यासक्रम/कार्यक्रम सर्वसमावेशक आहेत. या कार्यक्रमाद्वारे केवळ शिक्षणच होत नाही, तर तुमचा दृष्टिकोन बदलण्यास साहाय्य होते. नवनवीन तंत्रज्ञानाला सामोरे जाण्याचा आत्मविश्वास निर्माण होतो. या माध्यमातून तुम्हाला विविध सरकारी अधिकाऱ्यांची मते जाणून घेता येतात, त्यांच्याशी चर्चा करता येते. चर्चेतून दृष्टिकोन व्यापक करता येतो. कर्मचारी ते कर्मयोगीचा प्रवास या माध्यमातून सजगपणे करता येईल. तुम्हाला अधिक शंका असल्यास नेहमी विचारल्या जाणाऱ्या सर्व प्रश्नांची उत्तरे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संकेतस्थळ : www.igotkarmyogi.gov.in

**(अवर सचिव)**

# जपानवारी

जमीर लेंगरेकर

**कोणत्याही देशाची 'विकसित देश' अशी ओळख ही तिथल्या तंत्रज्ञान आणि उद्योगधंद्यामुळे जितकी असते, तितकीच ती तिथल्या लोकांची मूल्ये, वैयक्तिक आणि सार्वजनिक शिस्त, कर्मशीलता अशा गुणांमुळेसुद्धा होत असते. 'जपानवारी'च्या अनुभवातून मला ही ओळख झाली.**

माझ्या जपानवारीची सुरुवात होते ती या अभ्यासदौऱ्याचे मर्म समजून घेऊन एका प्रामाणिक विद्यार्थ्यासारख्या मी केलेल्या तयारीतून. बरेचदा आपले नियोजित प्रवास वास्तवात सुरू होण्याआधी आपण ते मनामध्ये सुरू करतो आणि तिथूनच त्या विशिष्ट प्रवासाची नांदी होते. माझा जपानचा अभ्यासदौरा असाच काहीसा मनात सुरू झालेला व नंतर वास्तवात आलेल्या स्वरूपातील होता; परंतु तिथून पुढच्या आयुष्यामध्ये हाच जपान दौरा स्मृतीमध्ये एक अविस्मरणीय कोपरा बनून राहिला आहे. जपानच्या अभ्यासदौऱ्याची बातमी ऐकताच सुरुवात झाली ती माझ्या बालपणापासूनच्या जपानविषयक संकल्पनांचे अवशेष पुनर्जीवित व्हायला. या दौऱ्याविषयी प्रचंड उत्सुकता तर होतीच; पण तितकेच अभ्यासाचे गांभीर्यही होते. व्यस्त शासकीय कामकाजातून शिकायला वेळ मिळाला की, तो पुरेपूर कारणी लागावा अशी माझी नेहमी प्रामाणिक इच्छा असते. माझ्या मनात सुरू झालेला जपान दौरा मला भारत आणि जपान यांच्या तुलनात्मक अभ्यासाच्या आवश्यकतेची जाणीव करून देत होता. या दौऱ्याच्या निमित्ताने मी केलेले पूर्वावलोकन एखाद्या झाडाला ज्याप्रमाणे नवीन चैत्रपालवी फुटते आणि त्या कोवळ्या पानांमध्ये गर्द रंगांच्या हजारो छटा दिसतात, त्याप्रमाणे आहे म्हणूनच ते समोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## स्मृतीतला जपान

जपान म्हटलं की, पहिल्यांदा आपल्या डोळ्यांसमोर येतो तो 'हिरोशिमा' आणि 'नागासाकी' या जपानी शहरांचा दुसऱ्या महायुद्धादरम्यान अमेरिकेच्या अणुबॉम्बने केलेला अमानुष विध्वंस; पण त्यापुढे जे चित्र डोळ्यांत भरतं ते राखेतून ज्या पद्धतीने फिनिक्स पक्षी भरारी घेतो; त्याप्रमाणे पुन्हा नव्याने एक प्रगत देश म्हणून जगासमोर आलेला जपान. सततच्या त्सुनामीमुळे धक्के खाणारा, तरीही अमेरिकेसारख्या मोठ्या देशाला सर्वांत जास्त गाड्या निर्यात करणारा एक इटुकला - पिटुकला बेटांचा देश! आशियाच्या एका टोकाला असणारा जपान हा छोटासा देश अशा अनेक कारणांनी ओळखला जातो. अर्थात, कोणत्याही देशाची 'विकसित देश' अशी ओळख ही तिथल्या तंत्रज्ञान आणि उद्योगधंद्यांमुळे जितकी असते, तितकीच ती तिथल्या लोकांची मूल्ये, वैयक्तिक आणि सार्वजनिक शिस्त, कर्मशीलता अशा गुणांमुळेसुद्धा असते; परंतु हे झाले थियरीमधले आणि अभ्यासातून तयार झालेले मत; पण वास्तविक पातळीवर देश नक्की विकसित देश कसा असतो आणि तिथले दैनंदिन राहणीमान व व्यवस्था कशी असते, याची प्रचंड उत्सुकता माझ्याही मनात होती. यामुळेच जपानवारी ही फक्त अभ्यासाची संधी नव्हे, तर एक शालेय जीवनापासून बाळगलेले स्वप्न पूर्ण करणारी एक साक्षात्कारी घटना होती. यशदासारख्या लोकसेवकांना प्रशिक्षित करणाऱ्या संस्थेने नियोजित केलेला अभ्यासदौरा असल्याने भरगच्च प्रशिक्षण व अभ्यास संधी आणि सोबत सततची बौद्धिके हे ठरलेलं होतंच. त्यामुळे माझी थोडी थोडी शालेय अंगाने तयारी सुरू झाली होती.



## स्वच्छता आणि जपानी मूल्यांचा प्रभाव

जेव्हा जपानवारी नक्की झाली तेव्हाच माझ्या मनातील जपान अर्थात स्मृतीतल्या शेवटच्या 'थियरी' मधल्या आणि त्याविषयीच्या संकल्पना प्रकर्षाने माझ्या समोर येत होत्या. नैसर्गिक मनुष्य स्वभावाप्रमाणे कोणताही प्रवास सुरू होण्याआधी मन अतिशय उत्साही होऊन पूर्वनियोजन करू लागते. त्याप्रमाणे मीही जपानमध्ये नक्की काय-काय पाहायचे आणि कसे पाहायचे, याचे माझ्या पातळीवरचे नियोजन करत होतो. अर्थात लोकसेवक म्हणून माझे नियोजन हे पूर्णतः व्यावसायिक जबाबदारीने व्यापले होते; पण त्यातही थोडफार 'मामाच्या गावाला जाऊ या' अशा प्रकारचे प्रकरण होतेच आणि त्याची कारणेही तशीच होती.

जपानविषयीचे एक अत्यंत स्वाभाविक शालेय कुतूहल माझ्या मनाच्या खोल कोपऱ्यात अगदी बालपणापासून होते व अजूनही आहे. ज्या-ज्या वेळेस स्वच्छतेच्या गोष्टी मुलांना शिकवायच्या असतात, तेव्हा माझ्या शाळेतले एक शिक्षक नेहमी जपानमध्ये गेलेल्या एका भारतीय प्रवाशाची कथा सांगत. त्या कथेमध्ये असणारा भारतीय प्रवासी चॉकलेट खाऊन झाल्यानंतर वेष्टण जेव्हा रस्त्यावर

फेकू लागतो, तेव्हा ते पाहणारी एक जपानी मुलगी तिथे येऊन ते वेष्टण घेते आणि प्रवाशाला सांगते की, दुसरे चॉकलेट खाल्यानंतरसुद्धा ते वेष्टण ती घेईल आणि त्यासाठी चॉकलेट खाऊन होईपर्यंत ती प्रवाशासमोर थांबेल; कारण तिचा देश तिला स्वच्छ ठेवायचा आहे. या कथेमुळे अगदी लहानपणापासून जपान म्हणजे मुलांनी मोठ्यांना स्वच्छतेच्या शिस्तीचा पाठ द्यावा, असा प्रगत देश अशी दृढ संकल्पना मी मनात बाळगून होतो. या कथेतले वास्तव आणि कल्पना यावर मी कधीही तेवढा खोलात जाऊन विचार केला नव्हता; पण जपान म्हणजे स्वच्छता आणि स्वयंशिस्तीचा एक आदर्श अशी खोल समजूत माझ्या मनात अगदी शालेय जीवनापासून आहे आणि त्याची वास्तवात खात्री करायला मिळणार, याचा मला विशेष आनंद झालेला होता. या सर्व उत्सुकतेला नाही म्हटले तरी थोडे व्यावसायिक अंगही होते.

सन २०१४ पासून अत्यंत जोमात सुरू असलेल्या 'स्वच्छ भारत अभियाना'च्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय अधिकारी म्हणून सतत 'स्वभाव बदल' यावर विचार करताना त्या प्रवाशाला स्वच्छतेची शिस्त सभ्यपणे दाखवून देणारी ती जपानी मुलगी 'रोल मॉडेल' म्हणून सतत माझ्यासमोर येत होती. त्यामुळेच की काय जपानमध्ये शक्य तितके सार्वजनिक स्वच्छतेच्या व्यवस्था व त्यामधील लोकसहभाग यावर जाणीवपूर्वक अभ्यास करायचे असे मी ठरवले होते.

## जपानचे मातृभाषा प्रेम आणि निष्ठा

जपानी लोक त्यांच्या भाषेचा वापर फक्त देशांतर्गत माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी न करता जागतिक पातळीवरील सर्व सरकारी, निमसरकारी व खासगी व्यवहारांमध्येसुद्धा बोलताना जपानी भाषाच वापरतात. इतर भाषांमध्ये विशेषतः इंग्लिशमध्ये भाषांतर करू शकणारे दुभाषे यामुळेच चांगली माया जमवतात हा शोधपण मला लागला. (आमच्या सोबतही 'असोसिएशन ऑफ फ्रेंड्स ऑफ' जपानच्या दुभाषी स्वाती भागवत होत्या.) तरीही अजून मनामध्ये जपानच्या मातृभाषेच्या वापरासंबंधी काही मूलभूत शंका होत्याच. जपानी भाषेची माझ्या आजपर्यंतच्या आयुष्यातली आठवण म्हणजे कुठेतरी वाचलेला 'हायकू' हा प्रसिद्ध तीन ओळींमध्ये बद्ध असणारा विशेष काव्यप्रकार! या पलीकडे मला जपानी भाषेविषयी अथवा साहित्याविषयी विशेष अशी काहीच माहिती नव्हती. त्यामुळेच जपानी लोकांचे मातृभाषा प्रेम आणि त्यांची सर्वांगीण व्याप्ती समजून घेण्याचे कुतूहल कमी न होता हळूहळू वाढतच होते.

साधारणतः कोणताही देश किमान जागतिक व्यापार, सांस्कृतिक देवाण-घेवाण आणि आंतरराष्ट्रीय नातेसंबंध यासाठी तरी इंग्रजीचा वापर करतोच, अशी माझी ठाम समजूत होती. कदाचित भारत ही पूर्वाश्रमीची ब्रिटिश वसाहत असल्याने मला तेच शिकवण्यात आले होते. तरीही, जपान या छोट्या; पण विकसित देशाने फक्त 'मातृभाषाच' हा आग्रह का धरावा, समजून घेणे मला इतरही काही कारणांसाठी आवश्यक होते. आंतरराष्ट्रीय बाजारात छोट्या देशांना व्यापारासाठी इतर देशांसोबत सौहार्दाचे संबंध ठेवावे लागतात आणि या प्रक्रियेमध्ये साधारणपणे इंग्लिश ही प्रथम किंवा द्वितीय भाषा असणारे देश सतत इंग्लिश भाषेचाच आग्रह धरतात.

जपानसारख्या अतिशय छोट्या आणि नैसर्गिक; तसेच मानवनिर्मित युद्ध संकटाने ग्रासलेल्या देशाने आपले मातृभाषेवरील अखंड प्रेम आव्हानात्मक व्यापार व आंतरराष्ट्रीय नातेसंबंध या आघाडीवरसुद्धा कसे सांभाळले असावे, याचे औत्सुक्य कमी होत नव्हते; पण छोट्याशा जपानने भारतातल्या परदेशी भाषा शिक्षणात चांगलीच घुसखोरी केलीय एवढं कळायला मला अजिबात उशीर लागला नाही.

भाषा स्वाभिमान आणि मातृभाषेचा प्रखर वापर याच्या जोरावरच फक्त जपानच नव्हे, तर जवळजवळ सर्वच आशियायी देशांनी तंत्रज्ञानात संशोधने करून आपापली राष्ट्रे प्रगत बनवली आहेत, हे आता सर्वमान्य झाले आहे. जपानी लोक इंग्लिश न शिकण्यामागचे प्रमुख कारण हेच आहे की, त्यांनी कोणत्याही प्रकारची प्रगती इंग्रजीवर अवलंबून न राहता स्वतःच्या मातृभाषेचा वापर करून केलेली आहे. थोडक्यात, काय तर इंग्लिश बोलता आले नाही म्हणून जपानी लोकांची प्रगती कधी थांबली नाही किंवा त्यांना जीवनशैली बदलावी लागली नाही. इंग्लिश शिकण्यासाठी हजारोंनी फी देणाऱ्या भारत वगैरे देशांनी हा मातृभाषेचा धडा घेणे आवश्यक आहे. प्रचंड मातृभाषा प्रेम आणि निष्ठा अशी ही राष्ट्रभक्तीची व्याख्या होऊ शकते, हेच जपानमुळे समोर आले आहे, नाही का?

जपान हा भारतासारख्या मोठ्या आणि संपन्न देशास सर्व प्रकारे एक आदर्श देश म्हणून मार्गदर्शक आहे; परंतु आजपर्यंत भारत-जपान संबंध वाढवण्याचे विशेष प्रयत्न झाले नव्हते. अलीकडे बुलेट ट्रेन आणि दिल्ली- मुंबई कॉरिडोर वगैरे योजनांमध्ये जपान सरकार आणि कंपन्या यांच्या सहभागामुळे जपान भारताच्या विकासधोरणाच्या रडारवर आला आहे, हे माझ्यासारख्या नगरविकास प्रशासनामध्ये काम करणाऱ्या व्यक्तीला हे पाऊल अत्यंत स्वागतार्ह आहे, असे वाटते. भारतीय व जपानी संबंधांची ओळख मराठी वाचणाऱ्या प्रत्येकाला व्हावी, त्याचसोबत नागरी प्रशासन व विकास यामध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या होतकरू तरुणांना याबाबत माहिती मिळावी, यासाठी अत्यंत सोप्या भाषेत व कमीत कमी तांत्रिक शब्द वापरून माझे 'जपानवारी' हे पुस्तक तयार केले.

पुस्तकात वाचलेला आणि टिव्हीवर पाहिलेला जपान प्रत्यक्ष पाहिल्यानंतर आणि जपानी व्यक्तींशी स्वतः बोलल्यानंतर, त्यांची विकासगाथा जाणून घेतल्यानंतर, मला स्वतःला जाणवले की, सांस्कृतिकदृष्ट्या भारतीय व जपानी मूल्ये फार वेगळी नाहीत आणि त्यामध्ये बौद्ध धर्मासारख्या प्रगत धर्माचा समान दुवा आहे; पण जपानी उद्योजकता आणि चिकाटी हे गुण भारतीयांमधून काहीसे दूर जाऊन ब्रिटिश गुलामीतून आणि त्यापूर्वीच्या शतकांच्या वर्णिक गुलामीतून शिकलेला 'सेवा' मूल्य अनावश्यक पद्धतीने राहिले आहे. या साऱ्या निरीक्षणातून जाणवले की, भारतातील कला, उद्योग, विज्ञान या सगळ्यांना जर जपानी मूल्यांची जोड दिली, तर नवा विकसित भारत घडवण्याच्या कामी खूप मदत होईल. सध्याच्या 'स्मार्ट सिटी'च्या चर्चेत 'शाश्वत विकास' हा शब्द तितकासा गांभीर्याने आणि खोलात जाऊन समजून घेतला जात नाही. यामध्येसुद्धा जपानी विकास पद्धती आणि त्याचा गव्हर्नन्स यातून खूप काही शिकण्यासारखे आहे. या सर्व चिंतनातून 'जपानवारी'चा हा शब्दप्रपंच उभा राहिला आणि त्याला मूर्त रूप आले.

**अतिरिक्त आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका जि.ठाणे**

# सुलेखन मालिका (कॅलिग्राफी) भाग-१




**अजय भोसले**

## पार्श्वभूमी

देवनागरी ही सातव्या शतकातील प्राचीन लिपी आहे जी हिंदी, मराठी, नेपाळी यासह १३० हून अधिक भाषांमध्ये वापरली जाते. दुर्दैवाने आजच्या पिढीला आपल्या समृद्ध परंपरा, ज्ञान आणि साधनांची माहिती नाही. देवनागरी सुलेखनाच्या या मालिकेतून सुलेखनाच्या विविध टप्प्यांचे अंतरंग उलगडून दाखविण्यात येणार आहे.



## सुलेखनासाठी आवश्यक घटक

सुलेखन ही लेखनाची कला आहे. सुलेखनासाठी कोणते घटक आवश्यक असतात याची प्रथमतः माहिती घेऊ. लेखणी, कागद आणि शाई हे घटक खरेतर सुलेखनासाठी पुरेसे आहेत. देवनागरीत विविध प्रकारच्या लेखण्या वापरल्या जातात. *(वरील चित्र पाहावे.)* पुढील भागात वेगवेगळ्या लेखण्या,शाई, कागद याचीही माहिती देण्यात येणार आहे.

कलात्मक सुलेखनासाठी विशिष्ट पेन आणि कागद याची आवश्यकता असते. देवनागरी लेखनात ४५ अंशाचा कोन हे या लिपीचे मुख्य वैशिष्ट्य आहे. याकरिता वेगळी लेखणी वापरण्यात येते. तसेच सर्वसाधारण फाऊंटन पेनची शाई वापरण्यात येते. कागद कोणता वापरावा हे सरावाने कळते. तथापि सुरुवातीला १०० जी.एस.एम.चा कागद वापरण्यास हरकत नाही.


## सराव

१) उभी रेषा २) आडवी रेषा ३) वक्र रेषा या महत्त्वाच्या रेषा देवनागरी सुलेखनात महत्त्वाच्या आहेत. या ३ घटकांनी अक्षरे आकार घेतात. यासाठी प्रथमतः सोबतच्या चित्रात दर्शविल्याप्रमाणे बेसिक आकारांचा भरपूर सराव करा.

एक उदाहरण म्हणून 'व'चे उदाहरण चलचित्रणात दिले आहे. यात कोन हा खूप महत्त्वाचा घटक आहे. याच घटकाने वेगवेगळी वळणे घेता येतात. सुलेखन मालिकेत आपण केवळ अक्षरांची माहिती न घेता रंगसंगती, रचना, कॅलिग्राफीचे प्रकार अशा विविध अंगांची माहिती घेणार आहोत. *(कॅलिग्राफीचे फोटो पुढील पृष्ठावर...)*

**अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग.**





















**● सुलेखनकार ●**

अजय भोसले












# तारे जमीन पे

**पद्मजा पाठक**

**आकाशातील तारेच जमिनीवर अवतरल्याचा भास होत होता. ते तारे नसून काजवे आहेत हे जेव्हा लक्षात आले, तेव्हा विश्वासच बसेना. आजपर्यंत फक्त डोळ्यांसमोर काजवे चमकणे ही म्हण माहिती होती; परंतु इथे तर खरोखरचे काजवे चमकताना पाहत होते.**

'आई खेडेगाव कसं असतं गं?' लेकीच्या प्रश्नाने माझा भूतकाळ माझ्या डोळ्यासमोर उभा ठाकला. दर वर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत आम्हा भावंडांची रवानगी हमखास एखाद्या नातेवाईकाकडे गावाला होत असे. ठाणापाडा, नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबक तालुक्यातील एक खेडेगाव. चहूबाजूने हिरव्यागार वृक्षांनी आच्छादलेल्या डोंगरांमध्ये वसलेले आणि निसर्गाने विशेष लक्ष देऊन निसर्गरम्य सौंदर्य बहाल केलेले खेडेगाव. येथे भिल्ल आणि कातकरी आदिवासींची वसाहत जास्त प्रमाणात. एक प्राथमिक शाळा आणि धवलेश्वराचे सुरेख छोटे शंकराचे मंदिर असलेल्या या गावात सर्वजण गुण्यागोविंदाने राहत होते.

अशा सुरेख खेडेगावातील बालवाडी शिक्षिका असलेल्या मावशीकडे आम्हा भावंडांची एका सुट्टीत रवानगी झाली.

आईचा हात अजिबात न सोडता मी लाल रंगाच्या एस.टी.बसमधून खाली उतरले आणि सगळीकडे माती आणि दगड बघून खूप कावरीबावरी झाले. बाबांच्या मागून आम्ही सगळे बराच वेळ म्हणजे जवळजवळ दीड–दोन किलोमीटर चालत होतो. चारही बाजूंनी लहानमोठ्या झाडांनी डवरलेले डोंगरच डोंगर नजरेस पडत होते. रस्त्याच्या दुतर्फा तुरळक कौलारू घरे आणि अधूनमधून गाई–म्हशींचे गोठे नजरेस पडत होते. रस्त्याने चालताना सारख्या कोंबड्या, त्यांची छोटीछोटी पिल्लं पायात येत होती. शेळ्या–मेंढ्यादेखील शेपटी हलवत ब्यां ब्यां करत इथे तिथे पळत होत्या. मे महिना असूनही सुखद गारवा जाणवत होता. सायंकाळच्या सूर्याची कोवळी पिवळी उन्हं झाडांवर, पानाफुलांवर, कौलांवर झेप घेत होती,

आम्ही मावशीच्या घरी पोहोचलो. माझे हातपाय, कपडे मातीने छान रंगले होते. मावशीचे मातीने लिंपलेले शेणाने सारवलेले मागेपुढे मोठं अंगण असलेले कुडाचे कौलारू घर एकदम झकास होते. चार खोल्यांपैकी एक खोली खूप मोठी होती. त्यात दिवसा शाळा भरे. मोठमोठे निरनिराळ्या विषयांचे तक्ते, मुलांनी काढलेली चित्रे, थोर पुरुषांच्या तसबिरींनी शाळेच्या भिंती सजल्या होत्या. शाळा सुटली की, आम्हा मुलांचा त्या खोलीत मुक्त वावर असे. मावशीने केलेला खाऊ खाऊन फ्रेश होऊन आम्ही भावंडं अंगणात पळालो. खेळण्याच्या धामधुमीत संध्याकाळ सरली आणि अंधार पडू लागला. मावशी दिवे का नाही लावत म्हणून बघायला गेलो तेव्हा कळले गावात वीजच पोहोचलेली नाही. झालं, माझी तर भीतीने गाळणच उडाली. आपण आता इथे राहूच शकत नाही, कुठे आणून ठेवलं आम्हाला, असा मनाचा त्रागा सुरू झाला होता. त्या रागातच मी अंगणात येऊन बसले आणि काय आश्चर्य! सगळा आसमंत लुकलुकणाऱ्या चांदण्यांनी उजळून निघालेला बघून मी हरखून गेले. हळूहळू माझं मन शांत होत गेलं. इतकं स्वच्छ निरभ्र आकाश मला शहरात कधी बघायलाच मिळालं नव्हतं. अगदी मान दुखेपर्यंत मी आकाश न्याहाळत होते. रात्री ८ वाजता जेवून आम्ही भावंडं अंगणात गप्पाटप्पांत दंग झालो. दहा–बारा मिनिटे झाली असतील आणि बारीकबारीक लुकलुकणारे दोन पंख असणारे कीटक पुंजक्या पुंजक्याने आमच्या अवतीभोवती बागडू लागले. जणू काही आकाशातील तारेच जमिनीवर अवतरल्याचा मला भास होत होता. ते तारे नसून चक्क काजवे चमकत आहेत हे जेव्हा माझ्या लक्षात आले, तेव्हा माझा तर माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. आजपर्यंत फक्त डोळ्यांसमोर काजवे चमकणे ही म्हण माहिती होती. परंतु इथे तर मी खरोखरचे काजवे चमकताना पाहत होते. काजव्यांच्या चमकण्यामागचा मुख्य उद्देश आपल्या जोडीदाराला आकर्षित करून घेणे आणि आपलं अन्न शोधणे हा असतो. काजव्यांचा प्रकाश प्रखर नव्हता. परंतू असंख्य काजवे एकत्र आल्याने परिसर मात्र उजळून निघाला होता. दोन दिवसांनी आई–बाबा आम्हांला मावशीकडे सोपवून घरी परतले. आईला सोडून राहण्याच्या कल्पनेने मला खरंतर खूप रडू येत होते. परंतु ठाण्यापाड्याचा निसर्ग जाऊ नकोस म्हणून मला खुणावत होता. आई–बाबांना सकाळच्या एसटीमध्ये बसवून मावशीच्या परवानगीने आम्ही मुलं गावातील काही मुलांबरोबर थेट डोंगरावर पळालो. जंगलातील पक्षांच्या सुमधुर किलबिलाटापुढे आम्हाला आमचाच आवाज बेसूर वाटू लागला. झाडावरून आंबे, चिंचा, करवंद, पेरू काढताना आम्हाला कोणीही हटकत नव्हतं की ओरडत नव्हतं. या दिलखुलास वातावरणात आम्ही दोन दिवसांतच छान रुळलो.

गावात मावशीला बालवाडी शिक्षिकाबाई म्हणून खूप मान होता. गावकरी दररोज त्यांच्यापरीने काहीना काही घरी स्वतः बनवलेला खाऊ आमच्यासाठी आणून आमचे खाण्यापिण्याचे लाड करत होतेच. हा एकोपा मला इथेच दिसला. आम्हा मुलांना एके दिवशी एका शेतकरी कुटुंबाने खूप आपुलकीने जेवायला बोलावले होते. चुलीवरील हातावर थापलेल्या भाकरी, गरमागरम पिठले–भात असे पदार्थ समोर येताच आम्ही मुले अक्षरशः अधाशासारखे तुटून पडलो. घरी येऊन आम्ही असे सुस्त झोपलो, ते काजव्यांच्या प्रकाशानेच उठलो. एके सकाळी स्वयंपाक खोलीतून चुलीवर मोठ्या पातेलीत शिजणाऱ्या मटकीच्या उसळीच्या सुरेख घमघमाटाने जाग आली. मावशीने जाहीर केलं, मुलांनो आज आपल्याला वनभोजनाला जायचं आहे. लवकर तयार व्हा बालवाडीतील सर्व मुलं छानछान नटूनथटून बाहेर एका ओळीत उभी होती. आम्ही जवळच एका नैसर्गिकरीत्या बनलेल्या बागेत गेलो. दिवसभर गाणी, भेंड्या, खेळ धम्माल केली. लोकगीतांवर तर आम्ही सगळे थकेपर्यंत नाचलो.

मे महिना संपून जून सुरू झाला. पावसाचे टपोरे थेंब मातीत पडून अस्सल मातीचा सुगंध सर्वत्र दरवळू लागला. ठाणापाड्याचा संपूर्ण निसर्ग पावसात न्हाऊन निघत होता. कौलांवरून ओघळणाऱ्या पागोळ्यांकडे बघण्याचा नवीनच छंद मला जडला. पण रात्री पावसाने रौद्र रूप धारण केले की डोंगराकडे बघायला मला भीती वाटायची. जसा पाऊस सुरू झाला तसे माझ्या आवडीच्या चांदण्या, तारका, काजवे दिसेनासे व्हायला लागले आणि माझे मन खट्टू होऊ लागले. घरचे वेध सुरू झाले. आईची तीव्र आठवण येऊ लागली. ठाणापाडा हे इतके छोटे खेडे होते, की तेथे दिवसातून फक्त एकदाच संध्याकाळी बस यायची, ती रात्रभर गावातच थांबून सकाळी परतीच्या प्रवासाला निघायची. दररोज संध्याकाळी बस स्थानकावर मी आई–बाबांची वाट बघू लागले.

एके दिवशी आईला बसमधून उतरताना बघून डबडबल्या डोळ्यांनी आईच्या कुशीत शिरले. परतीच्या प्रवासाची बस जशी गावाबाहेर पडू लागली, तसे माझे लाडके गाव ठाणापाडा पुढच्या सुट्टीत परत येण्याचा आग्रह; आपल्या पावसाच्या रूपाने भरून आलेल्या साश्रूनयनांनी मला करत असल्याचे फक्त आणि फक्त मला एकटीलाच जाणवत होते.

**(निवृत्त शासकीय अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग)**

# उद्योजकतेचा कॅलिडोस्कोप

**किरण कुलकर्णी**

लहानपणी कॅलिडोस्कोप तयार केला आणि त्याच्याशी खेळताना हरखून गेल्यासारखं झालं! तेच बांगड्यांचे आणि काचेचे तुकडे; पण अँगल बदलला की नवीनच नक्षी तयार। एक नक्षी दुसऱ्या नक्षीसारखी कधीच नाही! प्रत्येक नक्षी युनिक! प्रत्येक नक्षीचं सौंदर्य आगळं, अद्‌भूत वाटायचं. मॅजिकच वाटायचं!

कॅलिडोस्कोप ही वस्तू नसून संकल्पना आहे, हे जरा मोठं झाल्यावर कळलं. अकिरो कुरोसावा या जपानी दिग्दर्शकाचा 'राशोमान' हा जगद्‌विख्यात चित्रपट पाहिल्यानंतर या संकल्पनेची खोली कळली. एकच घटना वेगवेगळ्या पात्रांच्या दृष्टिकोनातून किती वेगवेगळं रूप धारण करते, हे त्या चित्रपटात प्रभावीपणे दाखवलं आहे. शिवाजी सावंतांच्या 'मृत्युंजय'मध्ये महाभारतातल्या घटनांचा कॅलिडोस्कोपच मांडला आहे.

मग हा छंदच लागला! वैचारिक छंद म्हणा हवं तर...! एखाद्या घटनेकडे, परिस्थितीकडे किंवा संकल्पनेकडे कॅलिडोस्कोपिक पद्धतीने बघण्याचा छंद. त्यातून बौद्धिक आनंद तर मिळतोच; पण व्यक्तिमत्त्वाचा विकास होताना जाणवतो.

उद्योजकता या संकल्पनेकडे कॅलिडोस्कोपिक पद्धतीने पाहिलं तर अक्षरशः खजिनाच हाती लागतो. उद्योजकता हीच मुळी वृत्तीशी संबंधित गोष्ट आहे. त्यामुळे त्यावर परिणाम करणारे घटकही अनेक. अनुभव, शिक्षण, एक्सपोजर याबरोबरच नेणिवेतल्या घडामोडींशी या घटकांचा संबंध! त्यामुळे उद्योजकवृत्ती घडण्याची प्रक्रिया चांगलीच गुंतागुंतीची होऊन बसते. या प्रक्रियेचा सांगोपांग विचार करून त्यामध्ये वस्तुनिष्ठ आणि कालानुरूप भर टाकण्याचे आव्हान पेलणारे उद्योजकता प्रशिक्षणाचे क्षेत्र आहे.

उद्योजकीय गुणवत्तेचा वापर कुठे कुठे होऊ शकतो? या प्रश्नाचे उत्तर अगदीच सोपे आणि एका शब्दात आहे. 'सर्वत्र' असे ते उत्तर आहे. सर्व क्षेत्रांमध्ये, सर्व परिस्थितीमध्ये उद्योजकीय गुणवत्तेचा वापर होऊ शकतो. उपजीविकेच्या क्षेत्रातला वापर हा ठळक आणि ऑबव्हियस् असल्याने आपण सध्या फक्त त्याचाच विचार करू या. उपजीविकेच्या संदर्भात उद्योजकीय गुणवत्तेचा वापर याकडे कॅलिडोस्कोपिक पद्धतीने पाहिले, तर काय दिसते?

अर्थशास्त्र म्हणते, की उपजीविका तीन क्षेत्रांद्वारे होऊ शकते. कृषी (प्राथमिक क्षेत्र) व संबंधित कामे, उद्योग (दुय्यम क्षेत्र) यामध्ये लघु, सूक्ष्म, कुटीर, मध्यम इ. सर्व प्रकार आले आणि तिसरे म्हणजे सेवाक्षेत्र! यापैकी कुठल्याही क्षेत्रामध्ये उपजीविका चालवली जाऊ शकते. हे झाले क्षेत्रनिहाय वर्गीकरण! पण यातल्या कोणत्याही क्षेत्रातल्या उपजीविकेचे प्रकार मात्र तीनच पडतात.

१. रोजगार, २. स्वयंरोजगार, ३. उद्योग

या तीनही प्रकारांमध्ये उद्योजकीय गुणवत्तेचा वापर फायदेशीर आणि उपयुक्तच ठरतो. मात्र या तीनही प्रकारात उद्योजकीय गुणवत्तेचे स्वरूप आणि प्रकटीकरण वेगवेगळे असते. पारंपरिकरीत्या तिसऱ्या प्रकाराबाबत म्हणजे उद्योग चालवणे आणि त्यामध्ये उद्योजकीय गुणवत्तेचा वापर याबाबत बराच विचार आणि अभ्यास झाला आहे. त्याबाबत पुस्तकेही उपलब्ध आहेत. व्यवसाय संधीच्या शोधापासून ते भांडवल उभारणी आणि मनुष्यबळ नियोजन याबाबत बरेच लिहिले, बोलले गेले आहे. बड्या उद्योगपतींच्या प्रेरक यशोगाथा याबाबत आपल्याला बरेच काही शिकवून जातात. आपल्या अथक परिश्रमातून शून्यातून विश्व निर्माण करणारे आणि अनेक हातांना रोजगार पुरवणारे उद्योजक राष्ट्राच्या संपत्तीमध्ये भर तर टाकतातच; पण त्यांच्या विजिगिषु यशोगाथा युवकांसाठी प्रेरणास्रोत बनून राहतात. त्यांच्या जीवनातल्या छोट्या-छोट्या प्रसंगांमधूनही उद्योजकीय गुणवत्तेचा आविष्कार दिसून येतो.

स्वयंरोजगार हा जो दुसरा प्रकार आहे, तो वर उल्लेख केल्याप्रमाणे तिसऱ्या प्रकाराशी बऱ्याच अंशी साधर्म्य दाखवणारा आहे. स्वयंरोजगारी व्यक्ती मोठ्या उद्योगपतीप्रमाणे 'लाखाचा पोशिंदा' नसला, तरी त्याच्या क्षेत्रातला, त्याच्या उद्योजकीय गुणवत्तेचा आविष्कार तितकाच महत्त्वाचा असतो. कामाच्या पद्धतीत अथवा उत्पादन पद्धतीत अनुभवाच्या आधारावर स्वयंरोजगारी व्यक्ती छोटे-छोटे बदल करते. त्यामुळे त्याच्या उत्पन्नामध्ये मोठी वाढ होऊ शकते. या क्षेत्रातील उद्योजकवृत्तीबाबत अलीकडच्या काळात विचार आणि अभ्यास सुरू झालेला दिसतो. स्वयंरोजगारासाठी आवश्यक उद्योजकीय कौशल्ये ही तिसऱ्या प्रकारातल्या म्हणजे (मोठ्या) उद्योगातल्या आवश्यक उद्योजकीय कौशल्यांपेक्षा वेगळी आहेत. याचे भान निदान प्रशिक्षण क्षेत्राला तरी पूर्वीच आलेले आहे. त्यामुळे त्यासाठी जाणीवपूर्वक वेगळ्या प्रशिक्षणपद्धती वापरणेही अभिप्रेत आहे.

रोजगाराबाबत मात्र उद्योजकीय कौशल्यांचा पुरेसा पद्धतशीर विचार आणि अभ्यास झालेला दिसून येत नाही. इंग्रजीमध्ये यासाठी 'इंट्राप्रिन्युअरशिप' असा छान शब्द आहे. रोजगार करणाऱ्या व्यक्तीलाही उद्योजकीय कौशल्यांची निश्चितच आवश्यकता असते आणि त्याने/तिने ती आत्मसात करण्याचा प्रयत्नही करायला हवा. त्यासाठी पद्धतशीर प्रयत्न आवश्यक असतात. याबाबत मात्र आणखी विचार होण्याची गरज आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात रोजगार करणाऱ्या व्यक्तींना काही समान तर काही क्षेत्र विशिष्ट उद्योजकताविषयक प्रशिक्षणाची गरज असते. अशा प्रशिक्षणांमधून रोजगार व्यक्तीचा स्वतःचा व्यक्तिमत्त्व विकासही घडून येतो. त्याच्या मालकाच्या फायद्याइतकाच किंबहुना त्यापेक्षाही जास्त त्या व्यक्तीचा स्वतःचा फायदा होतो. या तीनही प्रकारात उद्योजकता जे वेगवेगळे रूप घेते, ते मला कॅलिडोस्कोपिक पद्धतीचे वाटते. उद्योजकतेचे 'मटेरिअल' जरी तेच असले, तरी त्याचे प्रकटीकरण आणि वापर याचे स्वरूप या प्रत्येक प्रकारात बदललेले दिसते. हा बदल टिपून तो नेमक्या स्वरूपात प्रशिक्षणार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम प्रशिक्षकाचे आहे, त्यासाठी प्रशिक्षकाने तो नीट समजावून घेणे गरजेचे आहे.

'लाखाचा पोशिंदा' होऊ शकणारे उद्योजक घडवणे, हे राष्ट्रकार्य आहे. देशाच्या संपत्तीमध्ये भर टाकणारे आणि बेरोजगारीच्या समस्येवर उतारा शोधणारे असे ते कार्य आहे; पण ते यांत्रिक स्वरूपाचे कार्य नाही. उद्योजक निर्माण करणारी फॅक्टरी उभारणे सोपे नाही. त्यासाठी

नुसते प्रशिक्षण पुरेसे ठरत नाही. प्रशिक्षणाबरोबरच प्रशिक्षणाव्यतिरिक्त कोणकोणत्या बाबींचा सपोर्ट आवश्यक आहे, ते शोधून त्याही यंत्रणा विकसित करणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, उद्योजकता विकासाचा निव्वळ प्रशिक्षण कार्यक्रम राबवून उद्योजक घडणार नाही, तर त्याला संशोधन, माहिती, सल्लासेवा, तंत्रज्ञान याची जोड देणारे उपक्रम राबवायला हवेत. खेड्यापाड्यातील तरुण-तरुणींना मुळात या तीनही प्रकारांची प्रथमतः संपूर्ण माहिती द्यायला हवी. प्राथमिक, दुय्यम आणि सेवा क्षेत्रातील रोजगार, स्वयंरोजगार आणि उद्योग या उपजीविकेच्या पर्यायांची ओळख करून द्यावयास हवी. प्रत्येक पर्यायामध्ये उद्योजकीय गुणवत्तेची आवश्यकता आणि उद्योजकीय कौशल्यांचे स्वरूप याबाबत प्रबोधन आवश्यक आहे. 'उद्योजकतेची ओळख' या शीर्षकाखाली छोटासा परिचयात्मक कार्यक्रम ही गरज भागवू शकेल. त्यानंतर आपल्या व्यक्तिमत्त्वाला आणि परिस्थितीला अनुरूप असा पर्याय निवडण्याची संधी युवक आणि युवतींना मिळू शकेल.

एकदा हा पर्याय ठरला, की त्यासाठी आवश्यक अशी उद्योजकीय कौशल्ये मिळवण्यासाठी त्या युवकाला/युवतीला प्रयत्न करता येतील. तीनपैकी (रोजगार की स्वयंरोजगार की उद्योग) एक पर्याय निवडला की, आयुष्यात उर्वरित दोन पर्यायांची दारे बंद होतात, असे मुळीच नाही. कित्येक यशस्वी उद्योगपतींनी स्वयंरोजगारातून सुरुवात केली आहे, तर प्रथम आपल्या क्षेत्रात काही क्षेत्रात काही काळ नोकरीचा अनुभव घेऊन मग उद्योग सुरू करून यशस्वी होणारेही खूप आहेत. स्वतःचा उद्योग उभारून 'लाखाचा पोशिंदा' होणे, हा कर्तबगारीचा कळसच असतो. त्याचा मार्ग काहींच्या बाबतीत रोजगारातून, काहींच्या बाबतीत स्वयंरोजगारातून, तर काहींच्या बाबतीत 'डायरेक्ट' जातो एवढेच! म्हणूनच रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या प्रशिक्षणांमधूनसुद्धा भावी यशस्वी उद्योजकाच्या निर्माणाची मुहूर्तमेढ रोवली जात असते, हे लक्षात ठेवायला हवे. तांत्रिक कौशल्य देणाऱ्या अनेक संस्था अस्तित्वात आहेत; पण उद्योजकीय कौशल्य शिकवणाऱ्या आणि युवक-युवतींना स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला, परिस्थितीला अनुरूप पर्याय निवडायला शिकवणाऱ्या आणि एवढेच नाही, तर प्रशिक्षणाव्यतिरिक्त उपक्रमांतून साहाय्य देणाऱ्या संस्थांची वानवा आहे. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) सारख्या सक्षम संस्था ही कामगिरी पार पाडू शकतात. त्यासाठीचे व्हिजन, तज्ज्ञ मनुष्यबळ, तंत्रज्ञानाची जोड आणि मेहनतीची तयारी या संस्थेच्या जमेच्या बाजू आहेत. त्यांच्या बळावर महाराष्ट्रच नव्हे, तर इतरही राज्यांतील युवक युवतींना त्यांच्यापुढील पर्याय समजावून सांगण्याचे आणि मार्गदर्शन करण्याचे महत्त्वाचे काम सतत चालू ठेवण्याचे आव्हान यशस्वीरीत्या पेलले जात आहे.

उद्योजकता या संकल्पनेचा असा कॅलिडोस्कोपिक पद्धतीने विचार एखाद्या विशिष्ट भूप्रदेशातील लोकसंख्येचे उपजीविका नियोजन तयार करण्यासाठीदेखील उपयुक्त ठरू शकतो. एखादे शहर, एखादी पंचक्रोशी अथवा एकाच पाणलोट क्षेत्रातील खेड्यांचा समूह यामधील लोकसंख्येचे आर्थिक उन्नयन साधण्यासाठी त्या भूप्रदेशातील लोकांसाठी उपजीविका नियोजन तयार करणे आवश्यक आहे, स्थानिक साधन संपत्तीचे वर्गीकरण अथवा वापराचे नियोजन यापेक्षा निराळे असे हे उपजीविका नियोजन असेल. ते उद्योजकीय कौशल्यांच्या गरजा आणि त्यांची पूर्तता या दृष्टिकोनातून करावे लागेल. एका अर्थी स्थानिक साधनसंपत्तीची यादी अथवा वापराचे नियोजन याच्या पुढील पाऊल म्हणजे उपजीविका नियोजन असेल. उदाहरणार्थ, एकाच पाणलोट क्षेत्रातील खेड्यांच्या समूहामध्ये राहणाऱ्या लोकसंख्येसाठी उपजिविका नियोजन कसे करता येईल? यामध्ये भूमिहीन, महिला, उपभोक्ता गट, शेतकरी असे सर्वच घटक गृहित धरून उद्योजकीय कौशल्यांच्या गरजा आणि त्यांची पूर्तता याचे प्रामुख्याने नियोजन करणे अपेक्षित राहील. त्यासाठीचे काही टप्पे पुढीलप्रमाणे अमलात आणावे लागतील.

१. स्थानिक साधनसंपत्तीची यादी, २. स्थानिक साधनसंपत्तीच्या वापराचे पर्याय, ३. रोजगार, स्वयंरोजगार आणि उद्योग या तीनही पर्यायांची परिचयात्मक माहिती कार्यक्रम, ४. कृषी, उद्योग आणि सेवाक्षेत्रातील वरील तीनही पर्यायांची माहिती (टप्पा २ च्या आधारे), ५. प्रत्येक पर्यायासाठी आवश्यक तांत्रिक कौशल्ये प्रशिक्षण, ६. प्रत्येक पर्यायासाठी आवश्यक उद्योजकीय कौशल्ये प्रशिक्षण, ७. उद्योजकीय कौशल्ये प्रशिक्षणाव्यतिरिक्त इतर साहाय्य, उदा. सल्लासेवा, वित्तपुरवठा, माहिती इ..३. उद्योजकीय कौशल्य प्रशिक्षण (Entrepreneurship Training) या टप्प्यांसाठी गरजेनुसार पुढीलप्रमाणे मॉड्युल्स तयार करावी लागतील.

१. पर्यायांसाठी परिचयात्मक कार्यक्रम (Orientation Programme), २. तांत्रिक कौशल्ये प्रशिक्षण (Skill Training), ३. उद्योजकीय कौशल्य प्रशिक्षण (Entrepreneurship Training), ४. प्रशिक्षणोत्तर साहाय्य (Handholding support)

वरीलपैकी २, ३ व ४ यासाठी रोजगार, स्वयंरोजगार आणि उद्योग या तीनही प्रकारांसाठी स्वतंत्र म्हणजे नऊ मॉड्युल्स आणि १ क्रमांकाचे अशी एकूण १० प्रकारची मॉड्युल्स तयार करणे आवश्यक आहे. अर्थातच आशय ठरवताना प्राथमिक की दुय्यम की सेवाक्षेत्र याचा विचार करावाच लागेल.

खरेतर, ग्रामीण भाग आहे की शहरी यापेक्षाही पर्यायांची सुस्पष्ट आणि आधीच माहिती

४. प्रशिक्षणोत्तर साहाय्य (Handholding support)

वरीलपैकी २, ३ व ४ यासाठी रोजगार, स्वयंरोजगार आणि उद्योग या तीनही प्रकारांसाठी स्वतंत्र म्हणजे नऊ मॉड्युल्स आणि १ क्रमांकाचे अशी एकूण १० प्रकारची मॉड्युल्स तयार करणे आवश्यक आहे. अर्थातच आशय ठरवताना प्राथमिक की दुय्यम की सेवाक्षेत्र याचा विचार करावाच लागेल.

खरेतर, ग्रामीण भाग आहे की शहरी यापेक्षाही पर्यायांची सुस्पष्ट आणि आधीच माहिती नसणे, हा खरा प्रश्न आहे. निवड करण्यासाठी पर्यायच माहिती नसतील, तर जो प्रथम दिसेल किंवा ज्याचा प्रभाव असेल, तोच पर्याय निवडला जाऊन निर्णय चुकण्याची शक्यता असते. उद्योजकता हा सर्वत्र वापरण्याची संकल्पना आहे आणि उपजीविकेच्या क्षेत्रात तर उद्योजकतेची भूमिका कळीची आहे, हे समजून घेतले, तर निव्वळ तांत्रिक कौशल्याच्या प्रशिक्षणांचे नियोजन म्हणजे उपजीविका नियोजन नव्हे, हे लक्षात येईल. उद्योजकता या संकल्पनेचा कॅलिडोस्कोपिक पद्धतीने विचार केला, तरच एखाद्या विशिष्ट भूप्रदेशातील लोकसंख्येसाठी उपजीविका नियोजन व्यवस्थित करता येईल आणि व्यवस्थितपणे अमलातही आणता येईल.

*(उद्योग विभागाच्या MCED संस्थेच्या 'Udyojak' मासिकात पूर्वप्रकाशित...)*

**सचिव, मराठी भाषा विभाग**

**वर्षा फडके-आंधळे**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या केवळ इंदूरच्या राणी नव्हत्या, तर त्या एक द्रष्ट्या प्रशासक, न्यायप्रिय नेत्या, धर्मपरायण समाजसुधारक आणि स्त्री सक्षमीकरणाच्या आद्य पुरस्कर्त्या होत्या. ३००व्या जयंतीनिमित्त, त्यांचे स्मरण त्यांच्या विचारांमधून नव्याने प्रेरणा घेण्याचे निमित्त आहे.

## प्रशासन आणि सामाजिक कार्य

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नेतृत्वात फक्त राज्यकारभारच नव्हता, तर त्यात धर्म, न्याय, लोकसेवा आणि नीतिमूल्यांचे सखोल अधिष्ठान होते. त्यांनी महेश्वरला आपली राजधानी बनवले. ही राजधानी एक आदर्श प्रशासनाचे प्रमाण होते. येथे अहिल्यादेवींनी एक पारदर्शक, न्यायपूर्ण आणि लोकाभिमुख राज्यकारभार चालवला. तेव्हाच्या काळात एक राणी प्रत्यक्षपणे जनतेच्या तक्रारी ऐकून त्यावर तत्काळ निर्णय घेते, अशी कल्पनाही करवत नाही; पण अहिल्यादेवी दररोज प्रजेसोबत संवाद साधत, त्यांच्या अडचणी समजून घेत आणि न्याय देत. हे त्यांचे कार्य आजच्या लोकशाही व्यवस्थेलाही मार्गदर्शक ठरावे असेच आहे. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य धार्मिक स्थळांचे पुनरुज्जीवन आणि समाजकल्याण यासाठी वाहिले. काशी विश्वनाथ, गंगाघाट, रामेश्वरम, सोमनाथ, द्वारका अशा अनेक प्राचीन आणि पवित्र स्थळांचा जीर्णोद्धार करून त्यांनी भारतीय सांस्कृतिक एकात्मतेचे धागे मजबूत केले. याशिवाय देशभर त्यांनी शेकडो धर्मशाळा, घाट, कुंड, विहिरी, अन्नछत्रे आणि विश्रामगृहे उभारली. हे कार्य कोणत्याही जाती-धर्माचा भेद न करता सर्वसामान्य जनतेसाठी केले. त्यांच्या या पुढाकारामुळे हजारो लोकांना निवारा, अन्न आणि आधार मिळाला. त्यांचे हे सामाजिक कार्य आजही संपूर्ण भारतात लोककल्याणकारी राज्यशासनाचा आदर्श नमुना मानले जाते. प्रशासन आणि समाजकारण यांचा असा सुरेख मिलाफ क्वचितच इतिहासात पाहायला मिळतो आणि त्याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर!

## स्त्री सक्षमीकरणाचे आदर्श!

भारतात १८व्या शतकातील स्त्रियांना घराच्या चार भिंतींपलीकडे जाण्याची मुभा नव्हती; पण अशा काळातही अहिल्यादेवी होळकर यांनी स्त्रियांनी आत्मनिर्भर बनण्यासाठी पुढाकार घेतला. त्या काळात त्यांनी सुरू केलेला महेश्वरी साडी उद्योग केवळ व्यवसाय नव्हता, तर तो एक सामाजिक क्रांतीचा भाग होता. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी काशी आणि इतर ठिकाणांहून कुशल विणकरांना महेश्वरला बोलावून स्थानिक महिलांना हातमाग प्रशिक्षण दिले आणि महिलांना घरोघरी बसून उत्पन्न मिळवण्याची संधी निर्माण केली. या उद्योगाने हजारो महिलांना केवळ रोजगारच दिला नाही, तर स्वाभिमान, ओळख आणि आत्मसन्मानही दिला. आजही महेश्वर व आसपासच्या भागात महेश्वरी साड्या विणणाऱ्या हजारो महिला आपल्याला पाहायला मिळतात. या साड्या केवळ पारंपरिक पोशाख नाहीत, तर त्या अहिल्यादेवींच्या द्रष्ट्या धोरणांचा आणि स्त्रीसन्मानाच्या तत्त्वांचा वस्त्ररूप अविष्कार आहेत. त्यांनी कोणत्याही जाती, धर्म, वर्ग यांचा भेद न करता सर्वांसाठी कार्य केले. १३ ऑगस्ट १७९५ रोजी या महान राणीने देहत्याग केला. धर्मशाळा, भजनमंडळे, सार्वजनिक पाणवठे आणि शिक्षणाच्या सुविधा त्यांनी महिलांसाठी खुल्या केल्या. त्या काळात जेव्हा स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान होते, तेव्हा त्यांनी महिलांना धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक निर्णयांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याची मुभा दिली. अहिल्यादेवींच्या या कार्यामुळेच त्यांना 'पुण्यश्लोक', 'लोकमाता' आणि 'राजमाता' अशा सन्मानार्थ उपाधी प्राप्त झाल्या. भारत सरकारने त्यांच्या स्मृतींना वंदन म्हणून टपाल तिकीट प्रकाशित करून त्यांच्या कार्याला उजाळा दिला आहे. इ.स. १७६७ साली त्यांनी महेश्वर येथे हातमाग उद्योग सुरू करून एक स्थायिक, गुणवत्ताधिष्ठित आणि बाजारपेठेचा विचार करणारा स्थानिक उद्योग उभारला. यामागील हेतू होता की, स्त्रियांना उपजीविकेचा मार्ग उपलब्ध करून देणे आणि महेश्वरला धार्मिक व पारंपरिक वस्त्रकलेचे केंद्र बनवणे. महेश्वरी साडी आणि अहिल्यादेवी यांचे नाते केवळ वस्त्रनिर्मितीपुरते मर्यादित नाही, तर ते महिला सक्षमीकरण, सांस्कृतिक वारसा आणि स्थानिक उद्योगाचा उत्कर्ष यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे.

अहिल्यादेवींच्या कार्यातून मिळणारा मूलभूत धडा म्हणजे – कोणताही व्यवसाय फक्त नफ्यासाठी नसून, समाजातील दुर्बल घटकांना सक्षम करण्याचे साधन असावे. त्यांची ही दूरदृष्टी आजच्या स्टार्टअप महिला उद्योजिकांसाठी मार्गदर्शक ठरते.

**(उपसंचालक (वृत्त), मावज, मंत्रालय, मुंबई.)**

**भारतीय इतिहासात मोठी युद्धे झाली, साम्राज्ये उभी राहिली आणि कोसळली, परंतु या साऱ्या घडामोडींमध्ये ज्या व्यक्तींनी आपल्या कार्याने समाजहित, धर्मरक्षण आणि जनकल्याण या मूल्यांना सर्वोच्च मान दिला, त्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्थान अग्रभागी आहे. त्यांच्या जीवनकार्याने सिद्ध केले की, एका स्त्रीचे नेतृत्व केवळ राजसिंहासनापुरते मर्यादित न राहता ते समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचू शकते.**

# आदर्श स्त्री नेतृत्वाला वंदन!




# आत्मा : मनाच्या पलीकडे

**अजय भोसले**

आत्मा हे एक विश्वव्यापी तत्त्व आहे. ते अविनाशी आहे. पंचमहाभूतांनी बनलेल्या शरीरात या तत्त्वामुळेच निर्माण होते चैतन्य. आत्मतत्त्व नित्यनूतन असतं. ते स्वयंभू आहे. ते येत नाही अन् जात नाही, केवळ असते. ते सतत गतिशील असल्याने ही संज्ञा मिळाली आहे. परमात्मा आणि जीवात्मा हे त्याचे दोन पैलू, तत्त्वज्ञानात त्यास 'आत्मन्' म्हणतात. हा इंद्रियगम्य नाही. पापरहित, जरामरणापासून मुक्त, तहानभूक नसलेला शाश्वत आहे. विशुद्ध आत्म्याला जाणल्याने अमृतानुभव येतो. शरीराचा व्यापार चालवणारी शक्ती म्हणजे प्राण! त्याच्या आत असतो मनोमय आत्मा. त्याच्या आत विज्ञानमय कोश आणि त्याच्या अंतर्भागात असतो आनंदमय आत्मा. तो तटस्थ असतो. साक्षीभावाने पाहतो. अदृश्य, अचिंत्य आणि अलक्षण असतो. हे आत्मज्ञान म्हणजे मुक्ती.

या आणि अशा उच्च आध्यात्मिक विषयांचा सखोल अभ्यास करणारे डॉ. रमेश नारायण हे सनदी अधिकारी. ७३ वर्षांचे तरूण. विशेष म्हणजे त्यांचा लेखन प्रवास वाचनाच्या छंदातून खऱ्या अर्थाने वयाच्या ६५ वर्षांनंतर सुरू झाला. ज्या वयात माणसं निवृत्ती पत्करतात, त्या वयात ते नवचैतन्याने काम करीत आहेत. वयानुसार




एक ठहराव त्यांच्या स्वभावात आला आहे. या ठहरावातून आत्मा या विषयाचे चिंतन झाले आहे. जनसामान्यात मिसळून माणसातली माणुसकी शोधणारी त्यांची गुणग्राहक वृत्ती पुस्तकातील बारकाव्यातून सहजपणे प्रतिबिंबित होते.

संसारात रमताना परब्रह्मीचे ठसे त्यांना कुठं, कसे गवसले? हे या कथासंग्रहात वाचक समजू शकतात. मानवी आणि अमानवी वृत्तींच्या सीमेवर भेटणारे 'आत्मे' कसे विचित्र अन् विलक्षण असतात, हा प्रत्यय येतो. या कथांमधली पात्रं प्रत्यक्षात असू शकतात, तशीच काही कल्पनेत भेटू शकतात. मूळ मुद्दा लेखक विसरत नाही, तो म्हणजे प्रत्येकाचा आत्मा आदराने जपणे. काही पात्रे आत्मा हरवलेली माणसे असतात, त्यांचं दर्शनही सहज होते.

आपपरभाव न बाळगता मोकळेपणाने इतरांचे ऐकून घेणे हा लेखकाचा विशेष मनोभाव. म्हणूनच या कथा जिवंत वाटतात. समोर आलेल्या व्यक्तिरेखेची बारीकसारीक स्वभाववैशिष्ट्ये सापडली, की भूमिकेचा आत्मा गवसतो, असे अभिनेते म्हणतात. लेखकसुद्धा आपल्या पात्रांच्या 'आत' पोहोचतो आणि सकस लेखन करतो. कथाकार डॉ. रमेश नारायण यांचे हे यश निश्चितच अभिमानास्पद आहे. समर्थ म्हणतात,

*'ऐसा जो अनुभव जाला ।*
*तोही नाशिवंतामध्ये आला ।*
*अनुभवावेगळा राहिला ।*
*तो तू आत्मा ।।' आत्माराम : ४*

मनातील निरतिशय शांतीचा जो अनुभव येतो, तो अर्थातच जाणिवेच्या सूक्ष्मतम अस्तित्वामुळेच! हा रसास्वाद ज्यांना घेता येतो तो कलावंत, असाच प्रत्यय या कथा वाचताना पानोपानी येतो.

एकंदर पंधरा कथांचा हा पुष्पगुच्छ विविध रंगांचा आणि रूपांचा आहे. प्रत्येक कथेचा रसास्वाद घेताना प्रस्तावना प्रदीर्घ होण्याची संभाव्य शक्यता आहे. एकूण रसायन सरस आणि सुरस आहे. 'जत्रा' कथेतील शाळकरी मुले घरी न सांगता दूर जत्रेला जतात. टूरिंग टॉकिजमध्ये फुकट सिनेमा कसा पाहतात. रात्र होते. घरी आल्यावर ओरडणारे बाबा आणि प्रकृती बरी नसूनही त्या नायकाला शाळेत पाठवतात. जत्रेतल्या गमती आहेतच, शेवटी मात्र रखवालदाराचा धक्कादायक प्रसंग कथेची उंची वाढवतो, तर 'समांतर'मध्ये घरासमोर राहायला आलेली ती आणि तिच्या प्रेमात पडलेला तो म्हणजे नायक श्याम. नंतर लेखक खुलासा करतो, ती विवाहित होती.

दोघांतील आंतरिक ओढ समांतर. 'पुढल्या जन्मी भेटू या..' म्हणून दिलेले वचन. निरोपाची केविलवाणी व्याकूळ अवस्था. लेखकाने अत्यंत तरलपणे हा क्षण टिपलाय. 'हिरमोड' कथेतील सुरेशची गावस्मृती विलक्षण बोलकी आहे. शेती विकल्यावर, घर सोडल्यावर फार परकेपण जाणवते. गाव 'आपला' आहे, या आप्तभावनेने तो जातो अन् आपलेपण हरवल्याचे दिसते. पडक्या घरात राहायचे कसे? काकूकडे गेल्यावर अंतरीची ओल दिसत नाही. महिनाभर राहण्याचा इरादा असतो, पण एका दिवसात गाव सोडावा

लागतो. घरचे लोक परत जाताना निराश होतात. खरेतर या कथेत उलटसुलट सटकेबाज संवाद असते तर... तसे प्रसंग आहेत; पण लेखकाने उदासीनता अबोलपणे परिणामकारक साधली आहे. कथालेखनाचे तंत्र आणि मंत्र लेखकास अवगत असल्याचे प्रत्येक कथा वाचताना वाचकास सहज समजू शकते.

'बळी' कथेची सुरुवातच अशी आहे, की उत्सुकतेपोटी वाचक वाचू लागतो. 'चंद्रकांत हरल्या मनानं सायंकाळी घरी आला. आल्या आल्या त्यानं आपला देह पलंगावर टाकला व खिन्न मनात झालेल्या विचारांची गर्दी हटविण्याचा प्रयत्न करू लागला, पण...'एका नोकरदाराची ही कथा. कुठल्याही माणसाच्या आयुष्यात ती घडू शकते. कार्यालयातील नालायक सहकाऱ्यांपासून जिव्हाळ्याच्या सहायकांपर्यंत आलेले बरेवाईट अनुभव आपलेही असू शकतात, इतके ते अस्सल आहेत. तर 'न्याय' कथाही मित्रांनी मित्राला फसविण्याच्या कथानकाभोवती फिरते. अनिलने अजयचा खून केलाय, असा आरोप, पुढे जे घडते ते चकित करते. लेखकाचे हे धक्कातंत्र अमेरिकी लेखक 'ओ हेन्री' याच्याप्रमाणे आहे. अर्थात हा शैलीपद्धतीत नियतीवाद किती आहे, हा समीक्षेचा विषय आहे.

सोबत, आत्मा, जगरहाटी, उद्ध्वस्त, झोका आणि आधार या कथासुद्धा अधिक लक्षणीय आणि चित्तवेधक आहेत. सर्व कथांत जाणवणारी विशेष बाब म्हणजे यात गावही आहे आणि नागरी जीवनही आहे. लेखकाची संवेदनक्षमता आणि त्याचे अचूक अवलोकन याची साक्ष पटते. लेखक समाजात किती खोलवर रुजलाय, याचा अंदाज येतो. या कथेतल्या पात्रांशी तो एकरूप झालाय याची खात्री पटते. दुसरा मुद्दा असा, की मध्यमवर्गाच्या पार्श्वभूमीवर वावरणारी काही पात्रे नात्यातील जाणिवा आणि उणिवा स्पष्ट करतात. संबंधांतील मर्यादा अधोरेखित करतात. मानवी जीवनाच्या अफाट विसंगत आणि विषय रूपगंधांचे संदर्भ त्यातून मिळतात.

डॉ. रमेश नारायण यांची शैली आशयानुसार बदलते. काही कथांत ते तपशील भरतात. कथा खुलतात. काही कथा हळुवार, नाजूक फुंकर घालतात. सतत प्रतिमांचा उपयोग न करता कथा वाचनीय ठरते. आशयाचे अविभाज्य घटक कसे आणि कोणते असतात, हे प्रत्यक्ष आत्मा वाचल्याशिवाय कळणार नाहीत.

डॉ. रमेश नारायण यांचे कथाविश्व वाचकास माणसाच्या जगण्या-वागण्याचे वेगळेपण दाखवते. ओळखीच्या चौकटीबाहेर जे अगाध जग रंगीबेरंगी लीला करते, ते आपल्या कवेत घेण्याचा प्रयत्न डॉ. रमेश नारायण मनापासून करताना दिसतात. कोणत्याही समाजाचे सुसंस्कृत वस्त्र विणताना संस्कारांचे उभे आडवे धागे एकता, समता आणि समरसता साधण्याचा प्रयत्न लेखक हा विणकराच्या भूमिकेतून प्रामाणिकपणे करतो. त्यातून तो आपल्या परिवर्तनशील मनाचे दर्शन घडवतो. अर्थात हा बदल संथपणे होत असल्याने वाचक तटस्थपणे 'जुने ते सोने' अनुभवतो आणि 'नवे ते हवे' हेही सांगतो. अनेक गोष्टींचा परस्परसंबंध आणि त्याचा अन्वयार्थ लावणे फार कठीण वाटत नाही. प्रस्तुत 'आत्मा' दृश्यरूपाने आपले रंजन करतो, हेच तर हवंय ना वाचकांना!

**(लेखक हे कवी, अमूर्त चित्रकार, सुलेखनकार, ब्लॉगर असून अवर सचिव, महाराष्ट्र शासन पदावर कार्यरत आहेत.)**



# मी...

**सुभाष नागप**

आपल्या आयुष्यात आपण सर्वांसाठी काहीना काही केलेले असते. आपले कुटुंबीय, भावंडे, नातेवाईक, केव्हा-केव्हा आपली मित्र मंडळी, त्या-त्या काळी आपण पुढे होऊन त्यांच्या पडत्या काळात आपल्यापैकी बऱ्याच जणांनी, बऱ्याच जणांना मदत केलेली असते.

पुढे आयुष्यात एक वेळ येते. आपल्याला एखाद्या दिवशी असे वाटू लागू शकते की, मी सर्वांसाठी, सर्वकाही करून आज मला काय मिळाले? माझी कोणाला पर्वा आहे? ज्याने त्याने माझ्या कडून फायदा करून घेतला. असे काही वाटून आपले मन दुखावत असेल, तर आपल्या मनाला आपण समजावले पाहिजे की, मी जे काही इतरांसाठी चांगले केले असेल, तर ते करत असताना मला जो आनंद व समाधान मिळत होते, तोच त्याचा परतावा होता. कोण भाच्याला मदत करतो, कोण पुतण्याला मदत करतो, तर कोण नातेवाईकांना, तर कोणी कोणाच्या कोणाला मदत करतो. ही मदत करताना आपल्या मनात नसते की, ही व्यक्ती भविष्यात आपल्याला विचारेल, इत्यादी. आपणांस त्या-त्या वेळी मिळालेले समाधान हेच कायमचा परतावा असतो.

वयाच्या ५ ते ६० या वयोगटात जे-जे असतात, ते शिकण्यासाठी, कामधंद्यासाठी पळत असतात. त्या नंतरच्या वयोगटातील आयुष्य हे कोणासाठी काय-काय केले, हे आठवण्याचे असले व त्यातून दुःख होत असले, तरी आपल्या आयुष्याच्या सावलीत जो आला, मग तो त्यातून हवे ते घेऊन गेला आणि काहीही असले तरी आपण सर्वांना मदत करण्यास पात्र होतो, असे समजून आनंदी व्हावे.


...आणि हो, आपल्या सर्वांना एक गोष्ट सांगावीशी वाटते की, आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात प्रत्येक टप्प्यावर आपल्याला अशी माणसे भेटत गेली, ज्यांनी आपल्याला पुढे येण्यास हात दिला, अशा सर्वांचे आपण जेथे असू तेथून आभार मानत राहिले पाहिजे व त्यांच्या आयुष्यासाठी हृदयापासून शुभेच्छा दिल्या पाहिजेत. ज्यांनी -ज्यांनी आपल्याला मदत केली, ज्ञान दिले, आशीर्वाद दिले, त्यांच्यासाठी आपण एवढे नक्कीच करू शकतो.

**उपसंचालक (लेखा) मा.व.ज.स., मुंबई.**

# सृजननिष्ठांची मांदियाळी मनोरंजनविश्वाची मुंबईवारी

**सागरकुमार कांबळे**

भारताचं आणि सृजनाचं अतूट नातं आहे. आपल्याला अनेक वर्षांचा सृजनाचा वारसा लाभला आहे. भारतीय परंपरेत कला आणि साहित्याची निर्मिती प्राचीन आहे. स्थापत्य कला, संगीत आणि नृत्य, लोकसाहित्य, विज्ञान, लोककला, चित्रकला, दृक्‌श्राव्य माध्यमं या सर्व घटकांनी सृजनशीलतेला वाव दिला. ज्यामुळे भारतीय कला आणि साहित्याची ओळख जगभर झाली, परंतु आता या सगळ्या परंपरेला आधुनिकतेची, व्यावसायिकतेची जोड देण्याबाबत जागतिक पातळीवर विचारमंथन सुरू आहे. हे सांगण्याचं कारण म्हणजे १ ते ४ मे २०२५ या कालावधीत बीकेसी मुंबई येथे 'वेव्हज् २०२५' ही पार पडलेली आंतरराष्ट्रीय भव्य परिषद. या परिषदेच्या माध्यमातून दृक्‌श्राव्य मनोरंजन क्षेत्रामध्ये जागतिक पातळीवर भारताने नेतृत्व केलं. प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटेल अशी ही संधी होती. या निमित्तानं सृजननिष्ठांची मांदियाळी मुंबईत पाहायला मिळाली. या मांदियाळीच्या साक्षीनं भारत आशय निर्मितीचा दाता होण्याच्या वाटा मोकळ्या होतीलच, शिवाय भविष्यात सृजनशील अर्थव्यवस्थेचा भारत कणा असेल, यात शंका नाही. मनोरंजनविश्वाच्या मुंबईवारीत भारताच्या




सांकृतिक सत्तेची बीजं रोवली गेली. यातून आपण जगाला फक्त कुशलच नाही तर सृजनशील शक्ती देऊ केली. चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके यांनी महाराष्ट्राच्या मातीत मनोरंजन विश्वाचा पाया रचला, त्याच मराठी मातीत आपल्या मायभूमीत मनोरंजन क्षेत्राला गवसणी घालणारी 'वेव्हज् २०२५' परिषद पार पडली याचा आनंद खूप आहे.

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या पुढाकाराने WAVES 2025 (World -udio Visual Entertainment Summit) ही परिषद जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे १ ते ४ मे दरम्यान पार पडली. या परिषदेमुळे 'क्रिएट इन इंडिया' हा दृष्टिकोन रूजला गेला. मुंबईत होणाऱ्या वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल ॲण्ड एंटरटेनमेंट समिट 'वेव्हज् २०२५'च्या निमित्ताने क्रिएटिव्ह एंटरटेनमेंट क्षेत्रातील जगातील सर्वात मोठा इव्हेंट पार पडला. जागतिक दर्जाच्या जगाची मनोरंजनाची भूक भारत भागवू शकतो. ही क्षमता ओळखून आपण तयारीदेखील सुरू केली होती. केंद्रीय माहिती व प्रसारण विभागाची मालाडला २४० एकर जागा आहे. या जागेवर जागतिक दर्जाच्या एंटरटेनमेंट हबची व्यवस्था उभी करण्यात येणार आहे. त्यामुळे जगातील करमणूक क्षेत्रातील नामवंत मुंबईकडे आकर्षित होतील. त्याचबरोबर आयआयसीटी म्हणजे इंडियन इंस्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी नावाची संस्था केंद्र सरकारने मुंबईला दिली आहे. ही महत्त्वाची संस्था मुंबईत असल्याने या क्षेत्रात मुंबई जगाच्या एक पाऊल पुढे असणार आहे. मनोरंजन क्षेत्राची मुंबई ही जागतिक राजधानी आहे. मुंबई मनोरंजन उद्योगाचे मोठे केंद्र आहे. मात्र, आयआयसीटी या नव्या संस्थेमुळे भारताच्या सृजनशील उद्योगास जागतिक दर्जाचे व्यासपीठ मिळाल आहे. या संस्थेच्या माध्यमातून मुंबईला जागतिक 'क्रिएटिव्ह हब' करण्याचा महत्त्वाकांक्षी उद्देश होता. हा प्रकल्प केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता, त्याचा लौकिक जगभरात झाला आहे. आयआयसीटीमुळे क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीमुळे



उद्योगाला नवी दिशा मिळाली. 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी' ही संस्था केवळ चित्रपट निर्मितीपुरती मर्यादित न राहता, डिजिटल कंटेंट, व्हीएफएक्स, ॲनिमेशन, ऑडिओ - व्हिज्युअल स्टोरी टेलिंग, मीडिया इनोव्हेशन ३.० तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांतील संशोधन व प्रशिक्षणात ही परिषद महत्त्वाची ठरली. यासाठी महाराष्ट्र राष्ट्र शासनाने गोरेगाव येथील फिल्मसिटी येथे जागा निश्चित केली आहे.

मालाड येथील माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या (आयबी) अखत्यारितील जवळपास २४० एकर जागेत भव्य क्रिएटिव्ह स्पेसचा विकास केला जाणार आहे. या योजनेत केंद्र आणि राज्य शासन एकत्र येऊन को-क्रिएशन मॉडेलद्वारे काम करणार असल्यामुळे पोस्ट प्रॉडक्शन, स्टुडिओज, फिल्म टेक्नोलॉजी, ॲनिमेशन आणि व्हिज्युअल इफेक्ट्ससारख्या आधुनिक सेवा आणि अभ्यासाचे वर्ल्ड क्लास सेंटर भविष्यात उभारले जाणार आहे. या प्रकल्पांमुळे मुंबईचं स्थान केवळ देशातच नव्हे, तर जगात एंटरटेंमेंट इंडस्ट्रीतील प्रमुख केंद्र म्हणून बळकट होणार, यात शंका नाही.

या परिषद आयोजनाचा मान महाराष्ट्राला मिळाला यामुळे जगातील 'क्रिएटिव्ह एंटरटेनमेंट' क्षेत्रे मुंबईकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित झालेली होती. जगाला भारताची नवी ओळख करून देण्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची महत्त्वाकांक्षी संकल्पना आहे. ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी या परिषदेच्या आयोजनाचा मान महाराष्ट्राला मिळाला. करमणूक क्षेत्राची अर्थव्यवस्था अतिशय जलदगतीने विकसित होत असल्यामुळे यामध्ये भारतानेदेखील अग्रेसर असले पाहिजे ही भूमिका होती. 'वेव्हज् २०२५'च्या निमित्ताने शंभरपेक्षा अधिक देश परिषदेसाठी भारतात आले होते. तसेच पाच हजार पेक्षा अधिक सहभागींची नोंद झाली होती. ही परिषद दरवर्षी मुंबईत होणार आहे. त्यामुळे मुंबईचे महत्त्व जागतिक पातळीवर नक्कीच वाढणार आहे. या परिषदेला महाराष्ट्र शासनाचे सहकार्य मिऴाले.

जगातील सृजनशील मान्यवर, धोरणकर्ते, उद्योग नेते, तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज, स्टार्टअप्स आणि देशभरातील तरुण कलाकार, लेखक, ॲनिमेटर्स, गेम डेव्हलपर्स आणि संगीतकारांचा सहभाग हे 'वेव्हज् २०२५' परिषदेचे वैशिष्ट्य होते. सध्या कंटेंट चोरी किंवा पायरेसी समस्या आहे. या समस्येवर मात करण्यासाठी फिंगरप्रिंटिंग, वॉटरमार्किंग, एआय आधारित ट्रॅकिंग तंत्रज्ञान यावरदेखील विचारविनिमय या परिषदेमध्ये करण्यात आला आहे. माध्यम क्षेत्रातील नेतृत्व, निर्माते, दिग्दर्शक आणि धोरणकर्ते एकत्र येऊन WAVES Declaration २०२५ तयार केले होते. हे घोषणापत्र जागतिक मीडिया आणि मनोरंजन क्षेत्रातील सहकार्य, नियमावली आणि नैतिकतेबाबत मार्गदर्शक ठरले. या परिषदेच्या निमित्ताने 'वेव्हज् बाजार' ही अभिनव संकल्पना सत्यात आणता आली. चित्रपट, दूरचित्रवाणी, ॲनिमेशन, गेमिंग, जाहिरात, एक्सआर, संगीत, ध्वनी संयोजन, रेडिओ यांसह अनेक माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील हितधारकांना एकत्र आणणारी 'वेव्हज् बाजार' ही एक अनोखी ई-बाजारपेठ उपलब्ध झाली होती. यामुळे उद्योग व्यावसायिक त्यांचे कौशल्य सहजपणे प्रदर्शित करू शकले, संभाव्य ग्राहकांशी जोडले गेल्यामुळे अर्थपूर्ण सहकार्य मिळाले याची खात्री करून हा मंच खरेदीदार आणि विक्रेत्यांमधील दुवा म्हणून या परिषदेकडे पाहिले पाहिजे. यामुळे नक्कीच मनोरंजन क्षेत्राला बळकटी मिळाली आहे.


**(सहायक संचालक (मा.), मावज, मंत्रालय, मुंबई.)**




एखादा पदार्थ, धान्य किंवा भाजी खाण्याजोगे करण्यासाठी आपण किती प्रकारच्या प्रक्रिया त्यावर करतो? बघू या किती आठवतात ते...

१) खुडून
२) निवडून
३) पाखडून
४) चाळून
५) वेचून
६) दळून
७) कांडून
८) मळून
९) भिजवून
१०) शिजवून
११) भाजून
१२) परतून
१३) गाळून
१४) धुवून
१५) वाळवून
१६) आटवून
१७) मुरवून
१८) तळून
१९) लाटून
२०) पसरून
२१) वाफवून
२२) कुटून
२३) वाटून
२४) कालवून
२५) साठवून
२६) खारवून
२७) पाकवुन
२८) ठेचून
२९) सोलून
३०) चिरून
३१) कापून
३२) नासवून
३३) फेटून
३४) ढवळून
३५) उकळवून
३६) वळून
३७) थापून
३८) उकडून
३९) उलथवून
४०) तिंबून
४१) मिसळून
४२) घुसळून
४३) चोचवून
४४) कातरून
४५) फोडून
४६) पाडून
४७) ओतून
४८) काढून
४९) झाकून
५०) खरवडून
५१) विरजून
५२) गुंडाळून
५३) बांधून
५४) टांगून
५५) रांधून
५६) कुस्करून
५७) चापून/चोपून
५८ ) पेरून
५९) कोचून
६०) उगाळून
६१) आंबवून
६२) उकडून
६३) गिळून


माणूस
जन्मलो तेव्हा
अगदी शुद्ध होतो मी
मग या जगानेच शिकविले
खरे - खोटे बोलायला
पुढे पुढे जाती-पातींची
मला ओळख मिळाली
माणूस म्हणून...
मला ओळख मिळाली
माणूस म्हणून...


मुक्ती
कधीतरी ठरवावं
लागेलच ना
हवंय काय ?
नुसती सुटका
की मुक्ती..


म्हणून
येता माझी आठवण
चेहरा तुझा खुलतो
म्हणून चाफा फुलतो
येता तुझा गंध
चेहरा माझा खुलतो
घ्याया गंध तुझा
म्हणून वारा झुलतो
येता ओल्या सरी
आपण सारे भुलतो
याव्या सरी ओल्या
म्हणून ढग खुलतो

## लवकरच पाऊस येईल म्हणून...

भिंतीच्या पोपड्यांतून
उडणाऱ्या परांच्या मुंग्या
सडा सारवणात
वळवळणारे किडे
शेणाचे गोळे हवेत वाहून नेणारे भुंगे पाहत
सुखावते माय

चिमण्यांची धुळांघोळ
गायी वासरांचं उड्या मारणं
धुरकट डोंगरालगत नाचणारे मोर पाहून
धुंदावतो बाप



कागदावरून पसरलेली शाई
पाणथडावर जमलेली काजव्यांची शाळा
चंद्राची सावली दिसल्यावर
शहारते मी


लवकरच पाऊस येईल म्हणून
कसं उधाणतं घर

**– नामदेव कोळी**
अनुवादक, भाषा संचालनालय १

## स्वरयोगी

छेडीत हृदयतार गात राहिलो नी,
शीळ वाजवीत पुढे जात राहिलो मी
मागे वळून नाही पाहिले मी,
पण कैक कानांना तृप्त करीत राहिलो मी
प्रेम तुमचे माझ्या ओठी गीत होऊन येते ओठ हलले अन्
शब्दमोती उधळीत आले मी
मी न तानसेन, मी न बैजू, नसे मज शास्त्रीच जाण
सूर माझा अंतर्नाद,
शारदेला पूजीत राहिलो मी
आयुष्यात गाणे आले,
गाणेच आयुष्य झाले
गीत माझे अमृतधारा,
अखंड वाहत राहिलो मी
वादळात जीवनाच्या,
सूर माझा सखा
खवळलेल्या सागरात,
दीपस्तंभ होऊन राहिलो मी

**– भरत लब्दे**



अशी तू...
तशी तू...


थंड वाऱ्याची झुळूक जशी तू,
कोकिळेची कुहुकुहु जशी तू,
असशील वयाने छोटी जरी तू,
माझी हृदयाची आभा मोठी तू,
पहिल्या पावसाचा सुगंध जशी तू,
पाण्यावरच्या तरंग जशी तू,
जाई, जुई मोगरा यांची
सुवासिक फुले जशी तू,
देवावरची श्रद्धा जशी तू
स्वतःवरचा विश्वास जशी तू
तिजोरीत जपलेले
माणिक, मोती जशी तू,
अशी तू आणि तशी तू,
मला [illegible] कशी तू,
माझ्या जीवनाची माय जशी तू,
दुधावरची साय जशी तू,
जन्मदात्या मातेचे रूप तू,
सौंदर्याची खाण जशी तू,
मी माय तुझी,
माझी माय जशी तू
माझी माय जशी तू.....
– [illegible]



आरसाही वाचतो
आताशा चेहरा माझा...
दीर्घ उन्हाळाही जाळतो
स्वप्नातील पाऊस माझा!

**दीपक चव्हाण**
माहिती अधिकारी, नाशिक.

# मनाला हूरहूर लावणारी ती पत्रे..!



**कुसुमानंद (प्रशांत कुसुम आनंदराव सातपुते)**

डाकिया डाक लाया..! खुशी का पैगाम लाया कहीं.. कहीं दर्दनाक लाया..! किशोर कुमार यांनी गायलेले आणि राजेश खन्नावर चित्रित हे गीत नव्वदच्या दशकात टीव्हीवर खास करून जाहिरातीत कधी–कधी 'रंगोली' मध्ये पाहिलेलं आजही आठवतंय. जाहिरात तशी फेमस होती. अगदी मनात रुतून ओठांना गुणगुणायला लावणारी! त्या आधी अमीन सयानीच्या आवाजातील बिनाका आणि नंतर सिबाका गीतमालामध्येही ऐकलेलं. घरी रेडिओ नव्हताच. टी व्ही चा पत्ता तर खूपच लांब! पण, गल्लीत याचा पुरेपूर आणि मनसोक्त आनंद घेतलेला.

आज हे सगळं आठवताना १५ पैशाच्या मनाला हुरहुर लावणाऱ्या पोस्ट कार्डची खाकी छबी, तर निळ्या रंगाच्या अंतर्देशीय पत्रामधील खुशालीचा मजकूर समोर येतोय. मला आजही आठवतंय सैन्यातून सुट्टीला आलेले माझे मामा अर्थात 'अभ्यास अण्णा' हे आमचा अभ्यास घ्यायचे. ते खूप अभ्यास करायचे, म्हणून त्यांचे नाव अभ्यास अण्णा पडलेले असे नंतर त्या नामाभिधानाचा शोध लागला. माझ्या लहानपणी ते अभ्यास करताना दिसले नसले तरी, आमचा अभ्यास मात्र, कडक शिस्तीत घ्यायचे. जयसिंगपूर नगरपरिषदेच्या ग्रंथालयातून पुस्तके आणून ते नेहमी वाचायचे.

एकदा अभ्यासात त्यांनी पत्र लेखन घेतले होते. मोठ्या मामांची मोठी मुलगी बाळंतीण झाली होती. तिच्या सासरी त्याविषयी पत्र लिहिण्यास त्यांनी सांगितले. पत्र पोहचल्यानंतर दोन-चार दिवसातच तिच्या सासरची मंडळी इकडे पोहोचली होती. बाळाला बघण्यासाठी प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. प्रत्यक्ष बाळाला पाहिल्यानंतर आणि 'पहिली बेटी तूप रोटी. लक्ष्मी आलीयं.. लक्ष्मी' असे म्हणत मामीने बाळाला मंडळींच्या हाती दिले, तशी ती सगळी बिथरलीत आणि खऱ्या अर्थाने घरच्या मंडळींवर 'तोंडसुख' घेऊ लागले. क्षणापूर्वी आनंदलेले चेहरे लालबुंद दिसू लागले. कुणाला काही कळायच्या आतच भांडण सुरू झाले. 'आम्हाला तुम्ही फसवलं. मुलगी झाली असताना 'मुलगा' झाला म्हणून खोटं कळवलं.' असे आरोप होऊ लागले. घरात सगळ्या आनंदावर विरजण पडले. अर्थात हे विरजण अशुद्धलेखनाने पडले होते. मामांच्या मुलाने मजकुरात 'मुलगी' शब्दातील शेवटच्या अक्षरावरील वेलांटीच गायब केली होती आणि हे पत्र तिच्या सासरी पोहोचले होते.

त्या दिवशी त्याला शुद्धलेखन आयुष्यभर लक्षात राहणारी शिक्षा मिळाली होती. झालेल्या चुकीचा उलगडा झाल्यानंतर पाहुणे शांत झाले. पुढच्यावेळी खरोखरच मुलगा झालेले पत्र मिळूनही पाहुण्यांनी 'तशी' सर्व मनाची तयारी करूनच घरात प्रवेश केला होता, तर अशी आमची पत्रलेखनाची तयारी होत होती. मामांच्या घरी लाकडी रेडिओ आजही आहे. हा सुरू केल्यावर थोड्या अवधीने तो गळा काढायचा. यावरील बातम्यांवर सगळ्यांच्या वेळा ठरलेल्या असत. रात्री १० वा बहुधा शुक्रवारी बिनाका गीतमाला हा गाण्यांचा कार्यक्रम असे. या कार्यक्रमात रेडिओवर आपले नाव ऐकायला मिळावे, म्हणून आम्ही सर्व मंडळी पोस्ट कार्ड पाठवून गाण्याची फर्माईश करत असू. पण नेहमी घोर निराशा होई. निवडक पत्रांनाच त्यावर स्थान मिळे. झुमरी तलैय्या हे नाव आजवर नकाशात कुठे दिसले नसले, तरी त्याचा शोध या कार्यक्रमात आम्हा सर्वांना लागलेला.

लाल शाईने अथवा अर्धे पत्र आले असले, तर त्याची बातमी अगदी गल्लीभर व्हायची. सासरी गेलेल्या माहेरवाशिणीची खुशाली याच पत्राने कळायची. पोस्ट कार्ड उघडे असल्याने ते घरी नसल्यास कुणाच्याही हाती पडल्याने गोपनीयता राहत नसे. मग, अशावेळी आंतर्देशीय पत्राचा वापर होत असे. यातून जादा मजकूर आणि गोपनीयता दोन्ही राखले जाई. सुख-दुःखाच्या बातम्या यातून समजायच्या. पोस्टमन गल्लीत आला की, 'आमचं काही पत्र आहे का?' अशी सर्रास विचारणा त्याला होत असे.

रक्षाबंधनसाठीच्या अनेक बहिणाबाईंच्या राख्या पोस्टाच्या पाकिटातून समस्त भाऊरायांना रवाना होत. नवीन लग्न झालेले नोकरी निमित्तानं दूरदेशी गेलेले समस्त पतीदेव याच पत्रातून आपली विरहाची प्रेमभावना व्यक्त करत.

आज हे सगळं आठवलं कारण, एनसीसीच्या शिबिरात भेट झालेल्या अनेक मित्रांच्या मला आलेल्या पत्रांचा खजिना नुकताच बाहेर काढला. ही सगळी पत्र पुन्हा एकदा वाचून काढलीत. मजकूर वाचून पुन्हा कँपमध्ये भटकून आलो. जम्मूमधील अमरजीत सिंग, केरळमधील राजेश पययोल्ली, गारगोटीत राहणारा पण, कोडंगल्लूरमध्ये भेटलेला मारुती वंजारे अशी अनेक पत्रे यात आहेत. नवीन वर्षाच्या शुभेच्छा देणारी, दिवाळीनिमित्त आलेली आणि बरेच विषय घेऊन आलेली.

मराठीत प्रिय, प्रशांत स.न.वि.वि. पत्र लिहिण्यास कारण की, असा सुरुवातीचा मायना असणारी आणि बरे असो आता जास्त काही लिहीत नाही. पत्र पुरे करतो. असा शेवट असणारा मजकूर! तर हिंदीत प्यारे प्रशान्त, My dear friend prashant अशी सुरुवात करून खत का जवाब जल्दी देना,' असा तितक्याच गोड भाषेत शेवट करणारी ही पत्रे मनाला मोहरून टाकत. याच पत्रातून एकमेकांचे फोटो पाठवलेले क्षण, मैत्रीवरील *'पतंग उडती है आकाश में.. धागा है मेरे हाथ में..तुम हो तुम्हारे गाँव में..लेकीन तुम्हारी तसबीर है मेरे दिल में..'* अशा अनेक लिहिलेल्या शायऱ्या आजही मनाला, जगण्याला उभारी देऊन समृद्ध करतात.

भावनाओं को मंजिल तक पहुँचानेवाली इन चिठ्ठियों का कभी बेइंतहा इंतजार करते थे हम..बहुत सारी खुशियाँ..कभी कबार गम.की खबर सुनानेवाली ए चिठ्ठियाँ को मोबाईलने खा लिया है और आदमीने अपना एहसास भी खो दिया है..!

१५ पैशाचं कार्ड खुशाली कळवत होतं, हूरहूर लावत होतं. एक रुपयाचं नाणं घेऊन एसटीडी, पीसीओच्या रांगेत राहत होतो. फोन लागला की, मनाबरोबर भावना आपसूक ओघळत होत्या. कधी-कधी आनंदाश्रू वाट मोकळी करत होते. अवघ्या काही रुपयात मिळणारी माया, आपुलकी, प्रेम आज हातात लाखाचा मोबाईल असूनही लोप पावली आहे. २४ तास संपर्कात असूनही ना ओढ ना हुरहुर केवळ माणसाला खोटं बोलायला भाग पाडत आहे.

पुन्हा एकदा आज पत्रं लिहायला बसलोय..पत्रातील हरवलेल्या मित्रांना शोधायला बसलोय.. बघू या ते आज कोठे आहेत, अन् काय करत आहेत? सापडले तर नक्की तुम्हाला कळवणार..! नाहीतर.. नव्या पत्त्यात हरवलेली, पत्ता न सापडलेली परत आलेली पत्रं आधीच्याच खजिन्यात सामील होणार..!

**जिल्हा माहिती अधिकारी, रत्नागिरी.**

# व्यक्ती आणि अजून काही वल्ली

**संजीव केळूसकर**

पु.ल. देशपांडे यांनी 'व्यक्ती आणि वल्ली' नावाचा एक कथा संग्रह लिहिला आहे. त्याकाळी आजूबाजूला दिसणाऱ्या वल्लीच्या व्यक्तीरेखा त्यांनी जिवंत केल्या आहेत; पण त्यातून काही निसटलेली पात्र आहेत. त्यातलाच एक निसटलेला हा एक...फेकाड्या...

त्या काळी पुलंच्या नजरेतून हे पात्र कसं निसटलं याचं आश्चर्यच आहे. आपल्या मित्रमंडळीच्या ग्रुपमध्ये हे पात्र हमखास आढळतं. त्याचं पाळण्यातलं नाव काहीही असो... पण सर्व ग्रुपमध्ये त्याची ओळख एकच असते....फेकाड्या... कोणी कल्पनाही करू शकत नाही अशा थापा मारण्यात त्यांचा हातखंडा असतो. विषय कोणातही असो त्यांचं त्या विषयात प्रावीण्य असतं. सहज साध्या... सोप्या गोष्टी करण्यात त्यांना स्वारस्य नसतं. तर अशा एका फेकाड्याची ही कथा.

आमचा एक बालमित्रही प्रचंड फेकाड्या होता. शाळा सुटल्यावर बऱ्याच वर्षांनी त्याची भेट झाली... इतर चौकशी नंतर हळूहळू, आता काय करतो, या विषयावर आमची गाडी आली आणि त्याची फेकूगिरीची सवय उसळून आली. आजूबाजूला बघत एकदम गंभीर आणि खासगी आवाजात त्याने सांगितलं की... तो एका गुप्तहेर संघटनेचा एजंट आहे...मला पण लहानपणापासून त्याच्या थापा ऐकायची सवय असल्याने दचकून उडल्याची ॲक्टिंग केली.

काय सांगतोस काय.

मग त्याचीही हिंमत वाढली.

आत्ताच एक कंसाईनमेंट देऊन आलो... माझा हात बघ... काही दिसतं का...

आता त्याच्या हातावर मच्छर चावल्याच्या निशाणाशिवाय मला तरी कांहीही दिसतं नव्हतं. माझ्या चेहेऱ्यावरच प्रश्नचिन्ह पाहून त्याची कळी खुलली. तो हसत म्हणाला की, काही विशेष नाही... दंडाला गोळी लागली होती काही वेळा पूर्वी...पण लगेच बरं झालं... आता मात्र मी खरंच बुचकळ्यात पडलो.

मग मात्र तो सुटलाच...

झालं काय की फॉरेनवरून आमचा गुप्त मेसेज आला होता की, एक महत्त्वाचं पार्सल आलं आहे. ते घेऊन हेड क्वार्टरला द्यायचं आहे. मी लगेच तयार झालो फेस मास्क लावला... मग मात्र तो सुटलाच... रेडी फॉर मिशनचा मेसेज दिला. बाईक काढली. आणि लगेच एअरपोर्टवर गेलो. तिथे आमचा दुसरा एजंट तयार होता. त्याने मला एक पार्सल दिलं आणि म्हणाला की, hurry up... दुश्मन आपल्या मागे आहे.

मी पण बाईक काढली. डायरेक्ट सुसाट निघालो. पण ते मागे लागले.

ते म्हणजे कोण, मी बावळटपणा चेहेऱ्यावर आणत म्हणालो.

अरे ते म्हणजे पाक एजंट

मला लक्षात आलं की, आता नवीन कथेतून आपली सुटका नाही. त्यांच्याकडे पण सुपर बाईक होत्या. मी चपळाईने एका टॉवर कडे बाईक थांबवली आणि धावत आत जाणार तितक्यात फट्ट ऽऽऽ... असा हलकासा आवाज झाला. त्यांनी सायलेंसर लावलेल्या पिस्तूलमधून गोळी झाडली होती आणि माझ्या दंडात कळ आली. माझ्या लक्षात आलं की, आपल्याला गोळी लागली आहे. आता खरं सांगायचं झालं तर याने आयुष्यात कधी दिवाळीच्या फटाक्याचं पिस्तूल पण हातात धरलं नव्हतं; पण मी श्रवणभक्ती सोडली नाही.

मी तसंच सुसाट धावत गच्चीत गेलो. ते पण धावत माझ्या मागे टॉवरमध्ये घुसले. माझ्या लक्षात आलं की, जखमी अवस्थेत मी इतक्या जणांशी लढू शकणार नाही. ते गच्चीच्या दारात दिसताच मी थेट गच्चीतून बाहेर जंप केली. आता इथे मला तोंडाचा भला मोठा आ..ऽऽऽ करणे आवश्यक होते.

पण नशिबाने बाजूला नारळाची झाडं होती. त्या झाडावर मी लटकलो. पण तिथून पुढं काय हा प्रश्न होता.... पण माझं कमांडो ट्रेनिंग तिथे कामी आलं. मी झटकन खिशातून माझा नाईफ काढला. दोन माडाच्या झावळ्या कापल्या आणि काखेत घट्ट पकडल्या...

मग काय... पक्ष्यासारखं हलवत या झाडावरून त्या झाडावर... झापझाप उडत headquarter ला पोचलो. पहिलं ते पार्सल बॉसला दिलं...; पण हातातून रक्त गळत होतं. या गडबडीत दंडात गोळी होतीच ते मी विसरलोच होतो. पण तिथे आमचे सर्जन तयार होते. त्यांनी लगेच एक ऑपरेशन केलं. आणि गोळी काढली; पण जखमेचं काय... मी पुन्हा बावळटपणे विचारलं...

तेच तर रहस्य आहे ना... डॉक्टर नी एक मॅजिक स्प्रे काढला आणि जखमेवर मारला आणि तिथे कसलीच खूण राहिली नाही. आता आतून वेदना आहे पण बाहेर काहीच कळतं नाही.

फक्त ही सिक्रेट कोणाला सांगू नका...

आता ही कथा ऐकून कोणाला खरी वाटणार नाही यांची खुद्द फेकड्यांनाही खात्री असते; पण ती कथा अनेकांना सांगून आपण खरंच असं काही करतो असा एक मानसिक परिणाम... काहीसा भ्रम त्यांना होतं असावा. अशा अनेक कथा त्यांच्याकडे असतात ज्या ते स्वतः कल्पना विश्वात जगत असतात. मात्र त्यातून कोणाची फसवणूक करण्याचा...लुबाडण्याचा त्यांचा हेतू नसतो.

ते भेटले की आपण फक्त चावी भरायची असते...


अरे आता काही नवीन मिशन आहे की नाही...

बस्स...इतके आवाहन त्याला पुरते...

मग कथा सुरू होते...

हो ना... त्याचं झालं असं की...हा..हा..हा...

**(निवृत्त शासकीय अधिकारी)**



# वेगळ्या वाटा

‘आपलं मंत्रालय’ या गृहपत्रिकेतील *वेगळ्या वाटा* या सदरातून शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या पाल्यांनी विविध क्षेत्रांमध्ये मिळवलेल्या उल्लेखनीय यशाचा आढावा घेतला जात आहे. या माध्यमातून त्यांच्या कार्यातील वेगळेपण व उल्लेखनीय कामगिरी अधोरेखित करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. अशा गुणवंत पाल्यांपैकी कु. श्वेता कुलकर्णी यांचा समावेश विशेषत्वाने करण्यात आलेला आहे. विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी केलेल्या कामगिरीचा सखोल आढावा घेण्याचा प्रयत्न या लेखातून करण्यात आला आहे.

खगोलशास्त्र हे केवळ आकाशातील घडामोडींचं निरीक्षण नाही, तर त्या पार्श्वभूमीवर जगाकडे पाहण्याची दृष्टी देणारं शास्त्र आहे. अलीकडच्या काळात खगोल निरीक्षणाला सर्वात मोठा धोका ठरतो आहे तो ‘प्रकाशप्रदूषण’. याच विषयावर अभ्यास करणाऱ्या २९ वर्षीय अभ्यासकाची आपण भेट घेणार आहोत. त्यांनी केवळ तांत्रिक पातळीवरच नव्हे, तर सामाजिक जाणिवेतूनही प्रकाशप्रदूषणाचा मागोवा घेतला आहे. त्यांच्या अभ्यासप्रवासाची ही एक सखोल आणि विचारप्रवृत्त करणारी मुलाखत...

## तुम्हाला खगोलशास्त्राची आवड कशी निर्माण झाली?

लहानपणापासून मला खूप वेगवेगळे प्रश्न पडायचे. बाहेर उल्का वर्षाव पाहायला जायचो, ताऱ्यांविषयी उत्सुकता होती. शहराबाहेर जिथे जास्त तारे दिसतात ते पाहताना हे काय आहे? असं विचारायचं. आई–बाबांनी माझ्यासाठी डॉ. जयंत नारळीकर यांची ‘अभयारण्य’ अशी पुस्तकं आणली. ती वाचत राहिले. कल्पना चावला, सुनीता विल्यम्स यांच्या कथा ऐकल्या, राकेश शर्मांचा स्पेसमधला प्रवास बघितला, त्यावेळी मला अंतराळात जाण्याची खूप इच्छा झाली.

माझ्या घरात स्वातंत्र्यलढा लढणारे होते. त्यामुळे देशासाठी काहीतरी मोठं करायची प्रेरणा होती आणि जेव्हा राकेश शर्मांनी भारताला स्पेसमधून पाहिलं, तेव्हा त्यास वाटणारा अभिमान आणि प्रेरणा मला खूप काही शिकवून गेले. हळूहळू माझा खगोलशास्त्रात रस वाढू लागला.

## खगोलशास्त्रात येण्यामागची प्रेरणा काय होती?

डॉ. जयंत नारळीकर यांची पुस्तके वाचून आणि त्यांची व्याख्याने ऐकून माझी क्युरिऑसिटी वाढली. माझा भाग्ययोग असा होता की, मी त्यांना प्रश्न विचारू शकले आणि त्यांनी मनापासून उत्तर दिले. नववीमध्ये सूर्यग्रहण पाहून ठरवलं की, मला खगोलशास्त्रात काहीतरी करायचं आहे.

माझ्या बालपणातील सायन्स आणि आर्ट्सची आवड एकत्र येऊन सायन्स कम्युनिकेशनची संधी मिळाली. तसेच भारताच्या अंतराळ मोहिमांनी मला प्रेरित केलं. विशेषतः मार्स ऑर्बिटर मिशनमधल्या महिला वैज्ञानिकांनी.

## नेहमीच्या पारंपरिक वाटा न निवडता ही वेगळी वाट का निवडली?

खगोलशास्त्र हे रात्रीचं शास्त्र असं खोटं समजलं जातं आणि मुलींसाठी रात्री बाहेर जाणं अवघड मानलं जातं. तसेच शालेय काळात माझं गणित व भौतिकशास्त्र फारसं छान नव्हतं. त्यामुळे अनेकदा निराशा येत असे. पण मी सतत स्वतःला तयार करत राहिले, प्रश्न विचारायला सुरुवात केली आणि शिकत राहिले.

मी कोणतेही रोल मॉडेल नव्हते, म्हणून स्वतःच मार्ग बनवला. जागतिक स्त्री खगोलशास्त्रज्ञांच्या उदाहरणाने मला बळ दिलं.

## तुम्ही कोणत्या विशिष्ट शाखेत काम करता?

मी सध्या मुख्यतः ‘डार्क स्काय कंझर्व्हेशन’, ’सायन्स कम्युनिकेशन’ आणि ‘खगोलशास्त्रातील शिक्षण व प्रशिक्षण’ या क्षेत्रांमध्ये काम करते. तसंच प्लॅनेटरी ॲस्ट्रोनॉमी, कॉस्मोलॉजी आणि एस्ट्रोफोटोग्राफीमध्येही रस आहे.

### एखाद्या खगोलशास्त्रीय निरीक्षणासाठी कोणती उपकरणे आणि तंत्रज्ञान वापरता?

मी टेलिस्कोप वापरते. ज्याने तारांगण, ग्रह आणि कॉमेट्स बघते. सध्या डिजिटल कॅमेरे आणि खगोलशास्त्रीय सॉफ्टवेअर्सचा वापरही करते. ज्यामुळे अधिक अचूक निरीक्षण शक्य होते. मी एस्ट्रोफोटोग्राफी करते. ज्यामध्ये मिल्की-वे, धूमकेतू आणि ऑरोरासारखी दृश्ये टिपते.

### तुम्हाला अलीकडे कोणते विशेष निरीक्षण/साधन सापडले का?

हो, न्यूझीलंडच्या टेकापो येथील डार्क स्काय रिझर्व्हमध्ये गेले होते, तिथे मी मिल्की-वे, कॉमेट आणि सोलर स्ट्रॉममुळे निर्माण होणारे सर्दन ऑरोरा (aurora australis) पाहिले, जो खूपच विस्मयकारी अनुभव होता.

### तुमच्या मते सौरमालेत अजून कोणते रहस्य उलगडणे बाकी आहे?

सौरमालेतील ग्रहांमधले जीवसृष्टीशी निगडित रहस्य अजूनही अज्ञात आहे.

### नवीन येणाऱ्या विद्यार्थ्यांना खगोलशास्त्रात करिअर करावे, असे का वाटते?

खगोलशास्त्र हे विविध शाखांचा संगम आहे – एस्ट्रोबायोलॉजी, प्लॅनेटरी सायन्स, रेडिओ खगोलशास्त्र, कॉस्मोलॉजी वगैरे. त्यामुळे यामध्ये नवनवीन संशोधनांसाठी आणि संधींसाठी खूप स्कोप आहे. तसेच विज्ञान व तंत्रज्ञान, संचार, शिक्षण या क्षेत्रांतही करिअर करता येते.



### तुमच्यासाठी खगोलशास्त्र म्हणजे काय आहे?

माझ्यासाठी खगोलशास्त्र म्हणजे आकाशातील गुपितं उलगडण्याची प्रक्रिया आणि मानवाला त्याच्या अस्तित्वाचा विचार करायला भाग पाडणारं शास्त्र.

### एवढ्या अवाढव्य ब्रह्मांडात माणसाचे स्थान तुम्हाला कसे वाटते?

ब्रह्मांड अतिशय विशाल आहे, पण आपण लहान तरीही त्याचा एक महत्त्वाचा भाग आहोत. एकतर जेव्हा आपल्याला जाणवतं आपण या युनिव्हर्सचा छोटासा पार्ट आहोत, तेव्हा दोन रिॲक्शन्स येतात. एकतर आपण काही केलं तरी ते मॅटर करणार नाही; मग लोक गिव्हअप करतात आणि दुसरी रिॲक्शन अशी असते, नथिंग मॅटर त्यामुळे मी काहीही करू शकतो, काही फरक पडणार नाही. याचा तुम्ही कसा उपयोग करून घ्यायचा हे तुमच्यावर आहे. त्यातून मला असा दृष्टिकोन मिळाला की, 'माझ्या स्वप्नांना लिमिट नाहीये त्यामुळे मी काय करू शकते हे मी डिसाईड करणार.'

### सध्या तुम्ही कोणत्या प्रकल्पावर काम करता आहात?

सध्या मी 'डार्क स्काय कंझर्व्हेशन' आणि 'डार्क स्काय पॉलिसी' यावर काम करतेय. तसेच आदिवासी मुलांसाठी 'ॲस्ट्रो ट्रायब' नावाचा प्रकल्प राबवत आहे. ज्यात मुलांना तारांकित आकाश निरीक्षण, टेलिस्कोप वापरणे आणि सायन्स कम्युनिकेशनमध्ये प्रशिक्षण दिलं जातं.

### खगोलशास्त्र क्षेत्रात तुमचा सर्वात संस्मरणीय अनुभव कोणता होता?

न्यूझीलंडच्या टेकापो लेकवर एका रात्री मला एकाच वेळी मिल्की-वे, कॉमेट आणि सर्दन ऑरोरा पाहायला मिळाले. त्या निसर्गाच्या अप्रतिम सौंदर्याने खूप प्रेरणा मिळाली.

### आजच्या पिढीला वेगळ्या वाटेबद्दल (करिअरबद्दल) काय सांगाल?

मला असं म्हणायचं आहे की, आपल्याला खूप माहिती असते; पण महत्त्वाचं काय आहे की, त्या माहितीला तुमच्या मनामध्ये ज्ञानामध्ये कसे रूपांतर करू शकतो, तर माहिती वेगळी आहे आणि ज्ञान वेगळं आहे. जसं की, एखादी कल्पना आहे. त्याचा वापर प्रत्येक जण कसा करतो, कल्पना ही माहिती आहे आणि त्याचा वापर प्रत्येक जण कसा करतो, हे ज्ञान आहे. आता एआय माहिती सर्वत्र उपलब्ध आहे ते चुकीचं नाही ती माहिती ज्ञानात रूपांतरित कशी करायची आणि सतत क्युरियस कसं राहायचं, हे खगोलशास्त्राने मला शिकवलं.

**(श्वेता कुलकर्णी या खगोलशास्त्राच्या अभ्यासक आहेत.)**

# विपश्यना

**निरोगी शरीर आनंदी आयुष्याचा पाया आहे. निरोगी शरीरास निरोगी मनाची आवश्यकता असते. निरोगी मनात जीवनाचा निखळ आनंद प्राप्त करण्याची क्षमता असते. निरोगी वा निकोप मन कसे तयार होईल? आयुष्यातील निखळ आनंद कसा उपभोगता येईल? जीवनातील दुःख कमी कसे करता येईल? हे प्रश्न कोणालाही पडणे साहजिकच आहे आणि त्यातूनच सुरू होतो शोध एका अद्‌भूत ज्ञानाचा, प्राचीन ध्यानविद्येचा. ती विद्या म्हणजेच विपश्यना.**

विपश्यना केंद्र व त्याचा शोध सुरू केला. सर्च इंजिनद्वारे महाराष्ट्रातील प्रमुख विपश्यना केंद्रे दर्शवण्यात आली. इगतपुरी येथील धम्मगिरी या केंद्राची निवड करून दहा दिवसांच्या शिबिरासाठी उपलब्ध असलेल्या तारखेच्या गटासाठी अर्ज करण्याचे ठरले. दहा दिवसांच्या शिबिरासाठी देण्यात आलेल्या नियमावलीस संमती दर्शविली व आज्ञावलीद्वारे अर्ज सादर केला. पुढील काही दिवसातच कन्फर्मेशन आले. धम्मगिरीचा प्रवास सुरू झाला.

मुंबईच्या धकाधकीच्या जीवनातून नाशिकच्या दिशेने पावले वळली. मध्ये रेल्वेवरील मार्गाने कल्याण स्थानकानंतर कसारा इगतपुरीच्या दिशेने रेल्वे धावू लागली. सह्याद्रीच्या डोंगर रांगानी वेढलेल्या इगतपुरी येथील धम्मगिरी या विपश्यना केंद्रच्या प्रवासाला सुरुवात झाली. इगतपुरी रेल्वे स्थानकावर उतरून पश्चिमेला बाहेर पडल्यावर शेयर रिक्षा करून धम्मगिरीच्या पायथाशी पोहोचलो. प्रवेशद्वारावर भव्य म्यानमार प्रवेशद्वाराने स्वागत केले. प्रवेश केंद्रावर धम्मसेवकांकडून प्राथमिक स्वरूपाची मुलाखत घेण्यात येऊन, आरोग्याची; तसेच शारीरिक व मानसिक तपासणी करण्यात आली. त्यानंतर केंद्रातील मला देण्यात आलेल्या रूमच्या चाव्या माझ्या हाती देण्यात आल्या. आवश्यक ते जुजबी साहित्य जवळ ठेवून मौल्यवान वस्तू, पैसे, मोबाइल लॉकरमध्ये जमा करण्यात आल्या. त्यानंतर दूरवरून आलेल्या विपश्यना साधकांसाठी भोजन व्यवस्था करण्यात आली होती. तेथे जाऊन चहा नाश्त्याचा आस्वाद घेतला.

सायंकाळी सर्व साधकांना एका मोठ्या धम्म हॉलमध्ये बसवून पुढील १० दिवसांच्या शिबिराची व येथे असलेल्या व्यवस्थेबद्दल, आहारविहाराबाबत, धम्म उपासनेबाबत माहिती देण्यात आली. त्यानंतर शिबिरासाठी आलेल्या ६०० साधकांची तीन वेगवेगळ्या धम्महॉलनिहाय विभागणी करण्यात आली. मला देण्यात आलेल्या धम्महॉलमध्ये दुसरी बैठक सुरू झाली. तेथे उपस्थित असलेल्या धम्मसेवक, धम्म आचार्य यांचा परिचय करून देण्यात आला. प्रत्येकाची आसनव्यवस्था नेमून देण्यात आली. तत्क्षणापासून आर्य मौनव्रतास सुरुवात झाली. रात्री ९.०० वाजता आजच्या दिवसाचा कार्यक्रम संपल्याचे जाहीर करून आपापल्या रुममध्ये जाण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्याप्रमाणे धम्महॉलपासून ५ मिनिटांच्या अंतरावर असलेल्या माझ्या रूमवर आलो. पुढील १० मिनिटातच रूममधील दिवे बंद करून झोपी जाण्याच्या सूचना धम्मसेवकांद्वारे केवळ खुणेद्वारे करण्यात आल्या. रोज रात्री मुंबईत १२.०० ते १२.३० वाजता झोपणारा मी त्या दिवशी प्रथमच रात्री ९.२० वाजता झोपेच्या अधीन झालो होतो.

दुसऱ्या दिवशी पहाटे ४.०० वा. धम्मसेवकांनी रुमच्या दरवाजावर हातातील लहानशा घंटेने घंटानाद करून जागे केले व शिबिराच्या दैनंदिन कार्यक्रमास खालीलप्रमाणे सुरुवात झाली.



प्रातः ४.०० वा. उठवण्याची घंटी, ४.३० ते ६.३० सकाळी धम्म हॉलमध्ये साधना, ६.३० ते ८.०० नाश्त्यासाठी सुटी, ८.०० ते ९.०० धम्म हॉलमध्ये सामूहिक ध्यानसाधना, ९.०० ते ११.०० आचार्यांच्या निर्देशानुसार हॉलमध्ये साधना, ११.०० ते १२.०० जेवणाची सुटी, १२.०० ते १.०० विश्रांती.

**काही प्रश्न असल्यास फक्त आचार्यांशी संक्षिप्त शब्दांमध्ये संवाद**

१.०० ते २.३० हॉलमध्ये साधना. स्वतः प्रयत्न करणे

२.३० ते ३.३० सामूहिक साधना.

३.३० ते ५.०० आचार्यांचे निर्देशानुसार साधना.

५.०० ते ६.०० चहापानासाठी सुटी

६.०० ते ७.०० हॉलमध्ये सामूहिक ध्यानसाधना.


७.०० ते ८.१५ हॉलमध्ये आचार्यांचे स्क्रीनवर प्रवचन

८.१५ ते ९.०० हॉलमध्ये सामूहिक साधना.

९.०० ते ९.३० साधनेसंदर्भात काही प्रश्न असल्यास आचार्यांसोबत चर्चा.

९.३० रात्री आपापल्या रूममध्ये जाऊन दिवे बंद करून झोपी जाणे.

याप्रमाणे दिनचर्या सुरू झाली. सुरुवातीचे ३ दिवस आनापान अर्थात श्वास आला कसा? गेला कसा? डोळे बंद करून त्याबाबतच्या संवेदना जागृत करणे. श्वास घेताना, श्वास सोडताना कोणत्या संवेदना जाणवतात. त्या संवेदनांकडे तटस्थ भावनेने पाहणे. त्यानंतर पुढील २ दिवस स्वतःच जास्तीत जास्त सराव करून संवेदनांना सूक्ष्मातिसूक्ष्म स्वरूपात जाणून घेणे. डोळे बंद करून श्वासाच्या साहाय्याने मन एका ठिकाणी केंद्रित करून शरीरावर होणाऱ्या संवेदनांची अनुभूती घेणे. मनाच्या कळत-नकळत येणाऱ्या विचारांना दूर ठेवणे. होणाऱ्या सुखद दुः खद संवेदनांकडे निरपेक्षवृत्तीने पाहणे. त्यानंतर सहाव्या-सातव्या दिवशी प्रत्यक्ष विपश्यना विद्या शिकवण्यात आली. मन श्वासाच्या साहाय्याने केंद्रित करून आलेला श्वास शरीरातील विविध भागांमध्ये कसा पोहोचतो, त्या वेळी तेथे काय संवेदना आहेत? श्वास सोडताना शरीराच्या निरनिराळ्या भागांमध्ये काय संवेदना होतात? श्वसनक्रिया सुरू असताना अपादमस्तक सूक्ष्मातिसूक्ष्म संवेदनांचा अभ्यास करण्यास शिकवले जाते. त्यानंतर आठव्या व नवव्या दिवशी ध्यानधारणा करण्यासाठी शून्यागारही उपलब्ध करून दिले जाते. तेथेही स्वअभ्यासाने शिकवण्यात आलेल्या विद्येचा सराव करण्यात सांगण्यात आले. दहाव्या दिवशी दुपारनंतर मंगलमैत्रीचा दिवस होता. या दिवशी दुपारच्या चहापानानंतर सोबत शिबिरात असलेल्या साधकांसोबत त्यांनाही आलेल्या अनुभवाची, संवेदनांची, ज्ञानाची, माहिती ऐकण्याची संधी मिळाली. संध्याकाळी चहापानानंतर पुन्हा साधनेस सुरुवात करून रात्री चित्रफीत दाखून आत्मसात करण्यात आलेल्या विद्येचा अधिक सराव करण्याबाबत सूचित करण्यात आले. ११व्या दिवशी ४.३० ते ६.३० या कालावधीत पुन्हा हॉलमध्ये सामूहिक साघना/विपश्यनेचा सराव करून सकाळी ६.३० वा. १० दिवसीय विपश्यना शिबिराची सांगता करण्यात आली.



खरोखरच विपश्यना विद्या आत्मसात करणे, त्यासाठी तपश्चर्या करणे, साधना करणे, तपश्चर्येअंति विद्याप्राप्तीचा साक्षात्कार होणे, अनुभूती होणे ही एक अविस्मरणीय घटनाच आहे. मनाच्या एकाग्रतेसाठी नैसर्गिक श्वासाच्या साहाय्याने जीवन जगत असताना आजूबाजूला होणाऱ्या सुखद/दुःखद घटनांनी विचलित न होता मानसिक व शारीरिक स्वास्थ्य स्थिर ठेवणे, या घटनांकडे तटस्थ, / सापेक्ष दृष्टीने पाहणे. मनाची शुद्धी, विचारांची शुद्धी, चित्ताची शुद्धी, सद्गुणांची प्राप्ती, साधकाला कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडू देण्याची क्षमता निर्माण करण्यात आली होती. स्वतःच्या अनुभूतीतून सत्याचा शोध घेणे, मन शुद्ध करणे ही एक प्रक्रिया आहे.

ही साधना प्राप्त करत असताना धम्मगिरीच्या परिसरातील निसर्गरम्य वातावरणाचाही मला खूपच लाभ झाला. मौन व्रत असताना मला शिबिरातील विश्रांतीच्या काळात तेथील सह्याद्रीच्या डोंगररांगावरून कोसळणारे धबधबे मन तृप्त करत होते. शिबिराच्या आवारातील निरनिराळी झाडे, फुले, फळे हेदेखील मौनावस्थेत माझ्याशी मूकपणे संवाद साधत होते. धम्मगिरी येथील पॅगोडावरील छोट्या घंटेचा किणकिणाटही मनाला प्रसन्न करत होता. निसर्गाच्या सहवासात होणारी दिवसाची सुरुवात व सायंकाळ प्रत्यक्ष अनुभवयास मिळते. सकाळी पक्षी घरट्याच्या बाहेर पडताना केलेला आवाज व सायंकाळी घरट्याकडे परत असताना केलेला किलबिलाट अनुभवयास मिळतो. मौनावस्थेत विपश्यना साधना करताना मीदेखील निसर्गाचाच एक घटक झालो होतो.

शिबिर पूर्ण होऊन बाहेर पडल्यावर एक प्रकारचा नवीनच साक्षात्कार झाल्याची जाणीव झाली. जीवनाकडे नव्याने पाहण्याचा दृष्टिकोन तयार होतो. तथागत गौतम बुद्धाने शोधून काढलेल्या विद्येची अनुभूती प्राप्त करण्याचे आंतरिक समाधान प्राप्त होते. या विद्याभासाद्वारे दुःखाची तीन कारणे आढळली ती म्हणजे मोह, द्वेष आणि अविद्या. या साधनेच्या निरंतर अभ्यासातून विकारांवर मात करता येऊ शकते याची अनुभूती मिळाली. आपल्या भूतलावरील सर्व प्राणिमात्रांनी सुखी व्हावे, अशी फलश्रुती ध्यानधारणेतून, साधनेतून मिळते. *'भवतू सब्ब मंगलम!'*

# निसर्गोपचार

## एक समग्र उपचार पद्धत

**डॉ. प्रकाश कोंडेकर**

आपण सर्वजण अन्नावर अवलंबून आहोत, हे तर नैसर्गिक आहे. मात्र, याचा अर्थ असा नाही की, आपण केवळ खाण्यासाठी जगावं, तर जगण्यासाठी खावं हे अधिक महत्त्वाचं आहे. अन्नाच्या जोडीला मानसिक आणि सामाजिक आरोग्य राखणे हेही तितकेच गरजेचे आहे.

आज अनेकांचा समज असा असतो की, आरोग्यदायी आहार म्हणजे आपल्याला आवडणारे पदार्थ सोडून न आवडणारे खाणे आणि जास्त खर्च करणे. मात्र, आरोग्यतज्ज्ञांनी हे लोकांना शिकवणे गरजेचे आहे की, आरोग्यदायी खाणे महागडे असावेच असे नाही.

औद्योगिकीकरणाच्या वाढत्या प्रभावामुळे, तसेच पाश्चिमात्य संस्कृतीच्या अंधानुकरणामुळे लोक पारंपरिक जेवणाऐवजी फास्ट फूडकडे झुकत आहेत. यामुळे शरीरात आम्ल आणि मिठाचे प्रमाण वाढते. त्याचवेळी ताज्या फळभाज्यांचे प्रमाण कमी होते.

पाश्चिमात्य देशांचा आढावा घेतला तर दिसते की, जेथे मांसाहार हा प्रमुख आहार होता, तिथे लोक शाकाहाराकडे वळताना दिसत आहेत आणि त्याही पुढे जात व्हेगन (Vegan) होत आहेत. कारण माणूस हा नैसर्गिकरीत्या मांसाहारी प्राणी नाही.



मात्र केवळ शाकाहारी असणं म्हणजेच आरोग्य उत्तम असंही म्हणता येणार नाही. अन्नघटकांचे प्रमाणबद्ध सेवन न झाल्यामुळे होणारे आजार हे योग्य प्रमाणातील पोषक घटक; तसेच योगासने, ध्यान आणि विश्रांती याच्या साहाय्याने सहज दूर करता येऊ शकतात.

हृदयविकारासारख्या गंभीर आजारांमध्ये आनुवंशिकता, लिंग, संस्कृती यांचा प्रभाव असतो; पण मूलभूत कारण म्हणजे चुकीचा आहार व व्यायामाचा अभाव.

स्थूलता (Obesity) ही प्रामुख्याने अंतःस्त्रावी दोष, वाढलेल्या चयापचय गरजा, मानसिक तणावामुळे अति खाणे अशा अनेक कारणांमुळे होते. ही स्थूलता अनेक आजारांची शक्यता व मृत्यूदर वाढवते.

Anorexia Nervosa हा आहाराशी संबंधित एक मानसिक आजार आहे, जो विशेषतः किशोरवयीन मुलींमध्ये दिसतो. या मुलींना भूक लागलेली असते, पण त्या खाण्याचे टाळतात, कारण त्यांना स्वतःची फिगर जपायची असते. त्यामुळे काही वेळा त्यांची शारीरिक वाढही थांबते.

याच्याविरुद्ध Bulimia Nervosa मध्ये, एकाच वेळी खूप खाणे (binge eating), त्यानंतर अपराधी वाटणे, खाल्लेले उलटवून टाकणे, झोपेचा अभाव, नैराश्य अशा मानसिक व शारीरिक त्रास होतात. त्यात बद्धकोष्ठता, स्नायू दुर्बलता, हाडे ठिसूळ होणे, चेहरा सुजणे, मूत्रपिंडांना नुकसान, फिट्स इ. त्रास होऊ शकतात. या सर्व विकारांवर योग्य आहार, योगासने, ध्यान, विश्रांती आणि नैसर्गिक उपायांचा वापर केल्यास उत्तम आणि प्रभावी उपचार शक्य होतो. निसर्गोपचार ही पद्धत पंचमहाभूतांवर आधारित आहे – हवा, पाणी, पृथ्वी, सूर्यप्रकाश आणि आकाश. आहारशास्त्र, रसोपचार, जलचिकित्सा, योग, मृत्तिकोपचार, ध्यान आणि विश्रांती हे निसर्गोपचाराचे मुख्य घटक आहेत.

या सर्व गोष्टींचा उपयोग 'सर्वांसाठी आरोग्य' हे २१व्या शतकाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी होतो. निसर्गोपचार ही एक समग्र उपचार पद्धती आहे. ती केवळ शरीराच्या एका भागावर लक्ष केंद्रित करत नाही, तर आजाराच्या मूळ कारणावर उपचार करते.

जर एखाद्याला डोकेदुखी असेल तर त्यामागचं कारण प्रत्येक व्यक्तीसाठी वेगळं असू शकतं. जर फक्त ॲस्पिरीन घेऊन डोकेदुखी थांबवली, तर आपण अंतर्गत वेदनेच्या मूळ कारणाकडे दुर्लक्ष करतो. प्रत्येक व्यक्तीच्या शरीरातच एक 'डॉक्टर' असतो. त्यामुळे जेव्हा व्यक्ती बरे होण्याची इच्छा बाळगते, तेव्हा शरीर आणि मन यांचं परस्परसंवाद घडतो, आणि हीच संवाद प्रक्रिया उपचार घडवते.

चिकित्सकांनी शरीर–मन यांचे परस्पर नाते ओळखणे अत्यावश्यक आहे. भावना नियंत्रित करणारी मेंदूतील लिंबिक प्रणाली ही घाम येणे, पचन, हृदयाचे ठोके अशा अनेक स्वायत्त क्रियांवर प्रभाव टाकते, आणि विचार, स्मरणशक्ती, बौद्धिक क्रिया या सेरेब्रल कॉर्टेक्सच्या नियंत्रणात असतात.

तणावग्रस्त परिस्थितीत हे दोन्ही भाग महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे शरीर व मन यांचं अतूट नातं आहे आणि एकमेकांवर त्यांचा प्रभाव असतो. नकारात्मक विचार आणि भावना ही रोगप्रवृत्ती निर्माण करतात.

अनेक पारंपरिक उपचारपद्धती या विश्वातील नियमांवर आधारलेल्या असतात. त्यात मानवी जीवनाला संपूर्ण सृष्टीच्या सुसंवादाचा एक भाग मानले जाते. रोग हा या समतोल बिघडल्यामुळे होतो आणि उपचाराचा उद्देश हा वैयक्तिक व सार्वत्रिक समतोल पुन्हा प्रस्थापित करण्याचा असतो.

अलीकडेच समग्र आरोग्य संकल्पना अधिक गती घेत आहे. ही धारणा आहे की, मानव एक बहुआयामी अस्तित्व आहे – शरीर, मन आणि आत्मा यांचे परस्परसंघटित अस्तित्व.

रोगाचा उगम हा केवळ शरीरातून नव्हे, तर मानसिक व आध्यात्मिक असमतोलातूनही होतो. शरीरात स्व–उपचार करण्याची अद्भूत क्षमता असते. आपत्कालीन परिस्थिती सोडता उपचारकाने शरीराला हा समतोल मिळवण्यासाठी मदत करावी, मार्गदर्शन करावे – हस्तक्षेप न करता.

खरे स्व–उपचार घडण्यासाठी उपचारकाने शरीर–मन–आत्मा यांच्यातील समरसता ओळखणे आवश्यक आहे आणि केवळ तेव्हाच, ही समग्र उपचारपद्धती खऱ्या अर्थाने प्रभावी ठरू शकते.

B.Sc (Hons), LL.B, N.D, AVR,
FRSH (London), BTER (UK)
IIPA Member.

# शिवराज्याभिषेक दिन
# मराठा साम्राज्याचा गौरवशाली अध्याय

**युवराज पाटील**

६ जून १६७४ – हा दिवस महाराष्ट्राच्या, नव्हे तर भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेलेला एक विलक्षण क्षण होता. याच दिवशी रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक संपन्न झाला आणि एक सार्वभौम हिंदवी स्वराज्य जन्मास आले.

श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक हा केवळ एका राजा किंवा सरदाराचा सत्तारोहण नव्हता; तर हा होता रयतेच्या राज्याचा उद्घोष – शतकानुशतकं परकीय आक्रमणांनी आणि जातीय विषमतेने पिचलेल्या समाजाच्या पुनर्जन्माचा क्षण.

## वैभवशाली सिंहासन

राज्याभिषेकासाठी खास तयार करण्यात आलेल्या सिंहासनाचे वर्णन करताना, बखरीत ३२ मण सोन्याचे सिंहासन असा स्पष्ट उल्लेख आहे.



तेव्हा सोन्याच्या वजनाचे प्राचीन परिमाण आणि त्याचे आधुनिक रूपांतरण असे आहे :

१ शेर = २४ तोळे

१ तोळा (जुना) = सुमारे ११.७५ ग्रॅम

१ शेर = २४ x ११.७५ = २८२ ग्रॅम

१ मण = १६ शेर = १६ x २८२ = ४५१२ ग्रॅम (म्हणजे सुमारे ४.५१२ किग्रॅ)

३२ मण = ३२ x ४५१२ = १,४४,३८४ ग्रॅम (म्हणजे १४४.३८४ किग्रॅ सोनं)

**सोन्याची आर्थिक किंमत**
**(सध्याच्या दराने)**

सध्याचा बाजारभाव (जून २०२५):

१ तोळा = ९७,०००

एकूण तोळे: १,४४,३८४ x ११.७५ = १२,२८०.५५ तोळे

एकूण किंमत: १२,२८०.५५ x ९७,००० = १,१९१,२१,३३,५०० = ₹ अंदाजे मूल्य : १,१९१ कोटी २१ लाख रुपये.

या सिंहासनाची किंमत आजच्या मापदंडाने थक्क करणारी आहे, परंतु त्याहून थोर होती ती रयतेच्या मनात त्या सिंहासनाला लाभलेली जागा! त्या काळी सिंहासन हे केवळ सत्ता नव्हे, तर सेवा, न्याय आणि स्वाभिमान यांचे प्रतीक होते.

## दुमदुमलेला रायगड आणि उर्जित भारतवर्ष

राज्याभिषेक प्रसंगी रायगड किल्ला विविध तालवाद्यांच्या निनादाने, शंखध्वनी, तुतारीनादांनी, जयजयकारांनी आणि मावळ्यांच्या जल्लोषाने निनादला होता. अठरापगड मावळा आपल्या राजांचे दर्शन घेण्यासाठी आसुसला होता. सह्याद्रीच्या कुशीत गुंजणाऱ्या त्या घोषात एक नवा भारत, नवे राजकीय तत्त्वज्ञान आणि स्वराज्य जन्माला येत होते.

सभासद बखरीत उल्लेख आहे की, या सोहळ्यात छत्रपती शिवाजी महाराजांनी १२ मावळ प्रांतांतील प्रमुख वीरांना विविध पदे, मानपत्रे, रत्न, हत्ती, घोडे, वस्त्रे, शस्त्रे प्रदान केली. ही केवळ दानशूरता नव्हती, तर त्यागाची मान्यता आणि नेतृत्वाची प्रामाणिक पावती होती.

## रायगड – इतिहासाची जिवंत साक्ष

या दिवशी रायगडाने अनुभवलेले वैभव पुढील केवळ सहा वर्षेच अनुभवले. ३ एप्रिल १६८० रोजी याच रायगडावर छत्रपती शिवाजी महाराज यांनी अंतिम श्वास घेतला.

रायगड हा केवळ एक किल्ला नव्हे, तो एक जिवंत इतिहास आहे. त्याच्या सिंहासनाने, दालनाने, दरबाराने आणि प्रत्येक पावलाने त्या काळातील न्याय, कणव, शौर्य आणि सन्मान अनुभवला आहे.

आजही जेव्हा आपण रायगडाच्या राजसिंहासनासमोर उभे राहतो, तेव्हा इतिहास डोळ्यांसमोर साकार होतो. ते सिंहासन केवळ सोन्याचं नव्हतं, तर स्वराज्याच्या अमोल मूल्यांनी झळाळलेलं होतं..!!

शिवराज्याभिषेक दिन म्हणजे अभिमान, स्वाभिमान आणि स्वातंत्र्याचा संदेश घेऊन येणारा दिवस. रायगडावर उभं राहून, महाराजांच्या आठवणीने आपण प्रेरणा घेतो, आणि त्या सिंहासनात प्रजेसाठी लढणारा राजा पुन्हा एकदा आपल्या हृदयात जागृत होतो.

राजे, तुम्ही गेल्यापासून रायगड अजून झोपलाच नाही हो...

त्याच्या आठवणी, त्याची गर्जना आणि त्याचा आत्मा अजूनही त्या दरबारात, त्या वाऱ्यात, त्या कड्यांत जिवंत आहे...

**(संदर्भ: सभासद बखर, शिवचरित्र, ऐतिहासिक परिमाणे आणि सध्याचा सोन्याचा बाजारभाव – जून २०२५)**

**जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव.**

# मंत्रालयात भरली TECH - वारी

**W**isdom through wellness and Work-life Balance

**A**wareness of Emerging technologies

**R**eform in Governance Practices

**I**nformed and Inclusive Workforce

**वर्षा फडके-आंधळे**

प्रशासकीय अधिकारी–कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी, त्यांच्यात प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्यासाठी टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग विक ५ ते ९ मे दरम्यान मंत्रालयात साजरा करण्यात आला. 'टेक वारी' म्हणजे महाराष्ट्र शासन आयोजित पहिली डिजिटल वारी होय. आधुनिक तंत्रज्ञान व नवीन कल्पनांचा संगम असून 'टेक वारी' ही मंत्रालयातून सुरू होऊन महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांच्या कानाकोपऱ्यात तंत्रज्ञानाचा प्रसार करून त्यामधून आधुनिक तंत्रस्नेही महाराष्ट्र घडविण्याची सुरुवात करण्यात आली. या 'टेक वारी'मध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन, सायबर सुरक्षा इत्यादी तंत्रज्ञानाबाबत सत्रे; तसेच तणाव व्यवस्थापन, आरोग्यदायी जीवनशैली, ध्यानधारणा याबाबतच्या कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. याप्रसंगी अनेक मान्यवरांनी खालीलप्रमाणे आपले अभिप्राय दिले.

## स्टार्टअप ही लोकचळवळ होणे गरजेचे – मंत्री मंगल प्रभात लोढा

एकेकाळी भारताचा जगभरात व्यापार होता. घराघरात लघु आणि कुटीर उद्योगही सुरु असायचे, त्यामुळेच भारताला 'सोने की चिडिया' म्हटले जात होते. देशाला पुन्हा ते वैभव मिळवून देण्यासाठी स्टार्टअप ही लोकचळवळ व्हायला हवी, असे प्रतिपादन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केले.

## डिजिटल युगात संवाद महत्त्वाचा – प्रभू गौर गोपाल दास

टेकवारीचे सत्र ५ मे ला 'प्रभावी व तणावमुक्त जीवन' या विषयावर प्रभु गौर गोपाल दास यांच्या मार्गदर्शनाने सुरू झाले. धकाधकीच्या आणि डिजिटल युगात माणसं जरी एकमेकांच्या संपर्कात असली, तरी मनाने दूर जात असल्याचे चित्र समाजात दिसून येत आहे. मोबाईल, सोशल मीडियाच्या सततच्या वापरामुळे प्रत्यक्ष संवाद कमी होत चालला आहे. त्यामुळे डिजिटल युगात संवाद महत्त्वाचा आहे. धावपळीच्या जीवनात संघर्षांवर यशस्वीरीत्या मात करण्यासाठी तणावमुक्त जीवनशैली आत्मसात करणे ही काळाची गरज आहे.

स्मार्टफोन, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड संगणक, आणि इंटरनेट यांसारखी तंत्रज्ञान आपला रोजचा भाग बनत आहेत. अशा काळात 'टेक्नोसॅव्ही' होणं ही केवळ गरज नसून ती एक अनिवार्यता बनली आहे. शिकणं ही एक प्रक्रिया आहे जी जन्मापासून मृत्यूपर्यंत सुरू असते. वय कितीही असो, नवीन कौशल्य शिकणे, भाषा आत्मसात करणे किंवा एखादा छंद जोपासणे यामुळे मेंदू अधिक कार्यक्षम राहतो.



## कामकाजात सुलभता आणण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा – मंदार कुलकर्णी

डिजिटल साधनांचा वापर करून प्रशासनिक कामकाज अधिक सुलभ करता येते. मायक्रोसॉफ्ट कोपायलट हा एक एआय–संचालित डिजिटल सहायक असून, तो विविध कार्यालयीन कामकाजात मदतीसाठी डिझाइन करण्यात आला आहे.

## कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे शासकीय कामकाजात पारदर्शकता व गतिमानता – एनआयसीचे महासंचालक अभिषेक सिंग

'एआय'च्या वापरामुळे शासकीय कामकाजात पारदर्शकता व गतिमानता येते. मात्र एआयचा वापर करताना सावधानता बाळगावी, असे प्रतिपादन राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राचे महासंचालक तथा इंडिया एआय मिशनचे अभिषेक सिंग यांनी केले. बँकिंग, आरोग्य, शेती, न्यायदान अशा सर्वच क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर होत आहे. हे तंत्रज्ञान परिवर्तनशील असून सातत्याने त्यात बदल होत आहेत. शासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे एकाच माहितीचा विविध योजना, उपक्रमांसाठी वापर करता येतो. जगभरातील मोठमोठ्या कंपन्यांमध्ये भारतीय मनुष्यबळ 'एआय'वर काम करत आहे. भारतात 'एआय' वापरासंबंधीचे कौशल्यपूर्ण मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. या मनुष्यबळाचा वापर भारतातील शासकीय कामकाजात 'एआय'च्या वापरासाठी करण्याचे केंद्र शासनाने ठरविले आहे. त्यासाठी केंद्र शासन एआय कोश तयार करत असून राज्याकडून डेटा गोळा करण्याचे काम सुरू आहे. त्याचप्रमाणे भाषिणी, भारत जेन, इंडिया 'एआय' अशी 'एआय'वर आधारित ॲप्लिकेशनही केंद्र शासनाने तयार केली आहेत.

## शासकीय कामकाजात विश्वासार्हता आणि सुरक्षा वाढवण्यासाठी ब्लॉकचेन प्रणाली प्रभावी – बेकर ह्यूज कंपनीचे तज्ज्ञ लौकिक रगजी

इंटरनेट ऑफ थिंग्ज (Internet of Things) या विषयावर व्याख्यान झाले. आपले दैनंदिन जीवन अधिक सुरक्षित व पारदर्शक करण्यासाठी ब्लॉकचेनचा प्रभावी वापर करता येऊ शकतो. पारदर्शकतेसाठी व भ्रष्टाचारविरोधी उपाय म्हणून त्याचा उपयोग होऊ शकतो, ही तंत्रज्ञान प्रणाली शासकीय कामकाजात विश्वासार्हता आणि सुरक्षा वाढवण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे, असे बेकर ह्यूज कंपनीचे तज्ज्ञ लौकिक रगजी यांनी सांगितले.

## 'भाषिणी'च्या माध्यमातून आता विविध भाषातील संवाद सुलभ होणार – अमिताभ नाग

'भाषिणी'च्या माध्यमातून संवादासाठी भाषा–भाषांमधील अंतर कमी होऊन नागरिकांचा अन्य भाषेतील संवाद अधिक सुलभ होईल, असे प्रतिपादन डिजिटल इंडिया भाषिणी विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ नाग यांनी केले.

'भाषा इंटरफेस फॉर इंडिया' या संकल्पनेवर आधारित 'भाषिणी' प्रकल्प सुरू करण्यात आला आहे, 'एआय' आधारित तंत्रज्ञानाचा वापर करून एक सर्वंकष संवादव्यवस्था उभी केली जात आहे. 'भाषिणी'मध्ये ऑडिओ–टू–टेक्स्ट, टेक्स्ट–टू–ऑडिओ, टेक्स्ट ट्रान्सलेशन अशा सुविधा देण्यात आल्या आहेत. केवळ मजकुराचे नाही तर आवाजावरून थेट आवाजात भाषांतरही शक्य झाले असल्याने एक व्यक्ती एका भाषेत बोलल्यास, समोरची व्यक्ती तो संवाद दुसऱ्या भाषेत सहज समजू शकते.

## इंटरनेट ऑफ थिंग्ज तंत्रज्ञानामुळे कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार – नॅसकॉमचे तज्ज्ञ रवींद्र देशपांडे

इंटरनेट ऑफ थिंग्ज तंत्रज्ञानामुळे शासनाच्या विविध सेवांमध्ये गतिमानता येऊन कार्यक्षमता वाढीस लागणार आहे. तसेच नागरिकांचे जीवनमान सुधारण्यास मदत होणार असल्याचे प्रतिपादन नॅसकॉमचे सिस्टिम इंटिग्रेशन तज्ज्ञ रवींद्र देशपांडे यांनी केले.

इंटरनेट ऑफ थिंग्ज तंत्रज्ञानाचा वापर करताना सायबर सुरक्षा देखील महत्त्वाची आहे. इंटरनेट ऑफ थिंग्ज तंत्रज्ञानाद्वारे इंटरनेटवर माहिती पाठविली जात असल्याने सायबर सुरक्षाविषयक संभाव्य जोखमीही पाहावी.

## पारंपरिक खाद्यसंस्कृती डिजिटल माध्यमातून नव्या पिढीकडे पोहोचविण्याचा प्रयत्न – मधुरा बाचल

आपली खाद्यसंस्कृती ही केवळ चवीनुसार नसून, ती आरोग्यदायी जीवनशैलीचा एक महत्त्वाचा भाग आहे. पारंपरिक धान्यांमध्ये असलेल्या पोषणमूल्यांचा उल्लेख करत त्यांनी ज्वारी, बाजरी, नाचणी यांसारख्या अन्नधान्यांचा नियमित आहारात समावेश करण्यावर भर दिला. आपण जे खातो तेच आपल्या संस्कृतीचे प्रतिबिंब असतं आणि ती चव पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे हीच आपली जबाबदारी आहे. मराठी पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा गोडवा आता केवळ स्वयंपाकघरापुरता मर्यादित न राहता डिजिटल माध्यमांतून जगभर पोहोचू लागला आहे. मराठी पदार्थांच्या रेसिपीज यूट्यूब, इन्स्टाग्राम आणि फेसबुकसारख्या माध्यमांद्वारे रोज शेकडो लोक बनवण्यास शिकतात.

## शासकीय कामात नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी अनेक टूल्स उपलब्ध – कृषी आयुक्त सुरज मांढरे

शासकीय कामात माहितीचे व्यवस्थापन, वेळेचे नियोजन, कामाचे निरीक्षण आणि अहवाल व्यवस्थापन करण्यासाठी नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी अनेक टूल्स उपलब्ध आहेत. या

टूल्सचा वापर केला तर नक्कीच शासकीय कामकाजात गतिमानता येईल, असे कृषी आयुक्त सुरज मांढरे यांनी या कार्यक्रमातील एका सत्रात सांगितले.

गुगल कीप, एव्हरनोट, मायक्रोसॉफ्ट वन नोट, गुगल ड्राइव्ह, ड्रॉपबॉक्स, क्लिकअप, मायक्रोसॉफ्ट टू डू, गुगल कॅलेंडर, गुगल शीट्स, टेलिग्राम याचा वापर करून आपले काम अधिक गतिमान करता येईल. टेक्नॉलॉजी ही अशी गोष्ट आहे, जी कोणताही भेदभाव न करता सर्वांना एका समान पातळीवर आणते. शरीर, रंग, जात, धर्म यांचा फरक न बघता ती सर्वांना उपयुक्त ठरते. मायक्रोसॉफ्ट वन नोट या टूल्सचा जर वापर केला, तर शासनाचे अनेक प्रश्न सुटतील. पेन्सिल असलेले टॅबलेट कामकाजात खूप उपयुक्त आहेत. हार्ड वर्कपेक्षा स्मार्ट वर्कवर भर दिला पाहिजे. शासनाचे काम करत असताना स्वतःदेखील तंत्रज्ञान अवगत करणे अपेक्षित आहे.

## आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने स्मार्ट बैठकांचे आयोजन आवश्यक – झूम इंडियाचे वितरण व्यवस्थापक शैलेश रंगारी

दुपारी ३ ते ४ या वेळेत मंत्रालयातील सातवा मजला समिती सभागृह क्रमांक तीन येथे 'स्मार्ट बैठक आयोजित करणे'या विषयावर झूम नेस्कॉमचे शैलेश रंगारी, मेहेर उल्ली पालेम यांचे व्याख्यान झाले. कोणतेही काम थांबत नाही, हे कोरोना काळात सर्वांना समजले आहे. या काळात सर्व क्षेत्रातील बैठका झूम ॲप्लिकेशनच्या माध्यमातून झाल्या. सर्व ठिकाणी विविध बैठकांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून स्मार्ट बैठकांचे आयोजन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन झूम इंडियाचे वितरण व्यवस्थापक शैलेश रंगारी यांनी केले.

## कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन, ड्रोन ही डिजिटल परिवर्तनाची पुढील लाट – केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान सचिव एस. कृष्णन

डिजिटीकरणाच्या क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञानाच्या वापराने कार्यप्रणाली सुधारण्यासाठी केंद्र शासन विविध उपाययोजनांवर विचार करत आहे. विशेषतः शासकीय प्रणालीतील प्रक्रियांमध्ये सुधारणा आणि नागरिकांच्या सेवा अधिक सुलभ करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ब्लॉकचेन, ड्रोन आणि जीआयएस सारख्या नव्या तंत्रज्ञानांच्या वापरावर भर देण्यात येत आहे. डिजिटल परिवर्तनाची लाट शासकीय कामांमध्ये अधिक कार्यक्षम, समावेशक आणि सुलभ करण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरू शकते.

## सायबर गुन्ह्यांपासून बचावासाठी नागरिकांनी सजग राहावे – प्रसाद देवरे

फेक व्हिडीओ, डेटा चोरी रोखण्यासाठी सतर्कता बाळगा. सर्व ऑनलाइन खात्यांसाठी मजबूत पासवर्ड ठेवा; तसेच दुहेरी प्रमाणीकरण प्रणाली वापरा. अनोळखी व्यक्तींचे ई-मेल, मेसेजमधील लिंक्स उघडू नका. स्मार्टफोन, लॅपटॉप आणि 'आयओटी' डिव्हाईसेसचे सॉफ्टवेअर वेळोवेळी अपडेट करा. सार्वजनिक वायफाय वापरताना काळजी घ्या. बँकिंग किंवा खरेदीसाठी फक्त बँक किंवा अधिकृत प्रदात्यांचे ॲप्स वापरा असे सांगण्यात आले.

## सुदृढ आरोग्याची गुरुकिल्ली संतुलित आहार – आहारतज्ज्ञ ऋजुता दिवेकर

आहारतज्ज्ञ ऋतुजा दिवेकर यांचे 'आरोग्यदायी जीवनशैली' या विषयावर व्याख्यान झाले. आपण रोज जेवतो तोच खरा आहार (डाएट) असतो. त्यामुळे त्यात पोषणमूल्यांची योग्य सांगड घालणे अत्यंत आवश्यक आहे. घरच्या घरी बनवलेले पारंपरिक पदार्थ हेच शरीरासाठी सर्वोत्तम असतात कारण ते नैसर्गिक, पचायला हलके आणि संतुलित असतात. सुदृढ आरोग्याची गुरुकिल्ली ही अशाच संतुलित आहारात दडलेली आहे, असे आहारतज्ज्ञ ऋजुता दिवेकर म्हणाल्या.

## कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर सजगपणे आवश्यक – मनीष पोतदार

कृत्रिम बुद्धिमत्तासारख्या तंत्रज्ञानाचा वापर जितक्या मोठ्या प्रमाणात वाढतो आहे, तितक्याच मोठ्या प्रमाणावर त्याच्याशी संबंधित काही धोकेही आहेत. काही वेळा हे तंत्रज्ञान आपल्याला वास्तवापासून दूर नेते, ज्या प्रश्नांची उत्तरे आपण शोधत आहोत, त्यापासून आपले लक्ष विचलित करते. त्यामुळे, या वापरासोबतच आपण त्याचे धोके ओळखणे आणि त्याबाबत सजग राहणे आवश्यक आहे, असे मत एलटीआय माईंडट्री कंपनीचे सह उपाध्यक्ष मनीष पोतदार यांनी व्यक्त केले.

## संतुलित आहार आरोग्यासाठी अधिक उपयुक्त – अन्वेषा पात्रा

'डब्यासाठीच्या आरोग्यदायी पदार्थांच्या पाककृती'या विषयावरती केटरिंग टेक्नॉलॉजी न्यूट्रिशन, इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटच्या अन्वेषा पात्रा यांचे व्याख्यान झाले. रोजच्या जेवणात विविध पोषणमूल्यांचा समावेश असलेला आहार केवळ शरीराला ऊर्जा तर पुरवतोच, पण रोगप्रतिकार शक्तीही वाढवतो. सुदृढ आरोग्यासाठी संतुलित आहार अत्यंत महत्त्वाचा आहे, असे इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटच्या अन्वेषा पात्रा यांनी सांगितले.

### आपत्ती व्यवस्थापनात 'ई-पंचनामा'ची भूमिका

नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी नैसर्गिक आपत्तीमधील नुकसानीचे मूल्यांकन तंत्रज्ञानाच्या मदतीने कसे अधिक कार्यक्षम होऊ शकते, याचे उदाहरण 'ई-पंचनामा प्रणाली'द्वारे स्पष्ट केले. या प्रणालीमुळे थेट लाभ हस्तांतरण, ई-पिक पाहणी, राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण आणि मदत वितरण या साऱ्या प्रक्रिया सुलभ व पारदर्शक बनल्या आहेत. मोबाइल ॲप

व पोर्टलद्वारे मिळणाऱ्या डेटाच्या आधारे निर्णय प्रक्रिया अधिक जलद व अचूक होऊ शकते.

### धोरणात्मक अंमलबजावणीसाठी तंत्रज्ञानाचा वापर

नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी सिंहस्थ कुंभमेळा, तुळजापूर मंदिर संस्थान, वाळू उत्खनन आणि राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण यांसारख्या प्रकल्पांमध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करण्यात आला याची उदाहरणे दिली. जीआयएस, पिंग काउंट, जन स्वास्थ्य व्यवस्थापन इ. माध्यमातून कार्यपद्धतीचे संपूर्ण मॉनिटरिंग शक्य झाले. आयुष्मान भारत डिजिटल मिशन, युपीआय, अॅग्री स्टॅक याबाबतही त्यांनी माहिती दिली. तंत्रज्ञानाच्या प्रभावी अंमलबजावणीपूर्वी संबधित तंत्रज्ञानाची शाश्वतता, विस्तारक्षमता आणि अनुकरणीय आहे का, याबाबतही खात्री करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## मानसिक शांतता, आरोग्यवर्धनासाठी संगीत प्रभावी माध्यम – डॉ. संतोष बोराडे

मानवाच्या मानसिक, भावनिक आणि शारीरिक आरोग्यावर संगीताचा सकारात्मक परिणाम होतो, हे आता संशोधनातून सिद्ध झाले आहे. संगीत हे केवळ मनोरंजनाचे साधन न राहता, कार्यक्षमतेत वाढ, मानसिक शांतता आणि आरोग्यवर्धनासाठी प्रभावी माध्यम ठरू शकते, असे जीवनसंगीत समर्थक डॉ. संतोष बोराडे यांनी सांगितले.

तंत्रज्ञान म्हणजे केवळ यंत्र नाही, तर जीवन जगण्याची आधुनिक पद्धती आहे. छोट्या–छोट्या गोष्टी समजून घेतल्यास जीवन अधिक सुलभ आणि आनंददायी होऊ शकतं. आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात सतत अद्ययावत राहणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे हे जिवंतपणाचे लक्षण आहे.

### स्टार्टअप्सना मिळणार शासनाच्या विविध विभागांसोबत काम करण्याची संधी

कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा यांचे स्टार्टअप डेमो डे या विषयी व्याख्यान झाले. यावेळी विविध क्षेत्रातल्या २४ स्टार्टअपधारकांनी आपल्या नावीन्यपूर्ण प्रकल्पांची माहिती दिली. या उपक्रमांतर्गत निवड झालेल्या स्टार्टअप्सना त्यांच्या उत्पादन किंवा सेवेची शासनाच्या विविध विभागांमध्ये प्रायोगिक स्वरूपात अंमलबजावणी करण्यासाठी ज्या विभागासोबत काम करणार आहे त्या सर्व स्टार्टअप्सना प्रत्येकी १५ लाखांचा कार्यादेशही दिला जाणार असल्याची माहिती यावेळी अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती मनीषा वर्मा यांनी दिली.

## डिजिटल युगात कामात सुलभता आणि सुरक्षेसाठी संगणक सजग असणे आवश्यक – प्राजक्ता तळवलकर

डिजिटल युगात संगणक हा आपला अविभाज्य भाग बनला आहे. शिक्षण, व्यवसाय, बँकिंग, मनोरंजन अशा अनेक क्षेत्रांमध्ये संगणकाचा वापर होतो. या डिजिटल युगात संगणकाच्या मूलभूत गोष्टींची माहिती असणे आवश्यक आहेच, त्याचबरोबर कामामध्ये सुलभता, सुरक्षेच्या दृष्टीनेसुद्धा संगणक सजग असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मास्टेक नॉसकॉमच्या प्राजक्ता तळवलकर यांनी सांगितले.

प्रशासन काळानुरूप बदल स्वीकारणारे असेल तर लोकांना अधिक गतिमान, पारदर्शक व चांगल्या सेवा मिळू शकतात. सामान्य प्रशासन विभागाने आयोजित केलेला 'टेक वारी': महाराष्ट्र टेक लर्निंग विक' हा उपक्रम राज्यातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी प्रशासकीय क्षमता विस्तारण्यासाठी मार्गदर्शक ठरेल.

प्रभारी मुख्य सचिव राजेश कुमार यांनी, नवीन तंत्रज्ञान अवगत करून अधिकारी व कर्मचारी काम करत आहेतच; पण काळानुरूप आपल्या सेवा 'इज ऑफ लिव्हिंग' असल्या पाहिजेत. त्या अधिकाधिक लोकाभिमुख असाव्यात यासाठी प्रशासनाने काम केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या प्रयत्नामुळे आणि राज्यातील अधिकारी व कर्मचारी यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे आज केंद्र शासनाच्या 'ऑय गॉट' प्रणालीवर सर्वाधिक प्रशिक्षण घेणारे महाराष्ट्र राज्य देशातील पहिल्या तीनमध्ये आहे. 'टेक–वारी' उपक्रम नावीन्यपूर्ण असून त्याचा लाभ नक्कीच सर्व अधिकारी घेतील, असे मत महाराष्ट्र सदनाच्या आयुक्त आर. विमला यांनी व्यक्त केले.

याशिवाय महाराष्ट्रासाठी फ्रंटियर तंत्रज्ञान या विषयावर केंद्र शासनाच्या नीती आयोगाच्या देबजानी घोष यांचे व्याख्यान झाले.

याच विषयावर शासकीय कामकाजात फ्रंटियर तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर या विषयावर परिषद सभागृह सहावा मजला मंत्रालय विस्तार येथे महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार, विभागीय आयुक्त नागपूरच्या विजयालक्ष्मी बिदरी, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंग यांनीही आपले विचार मांडले.

### परंपरा आणि तंत्रज्ञानाचा सुरेख संगम साधणारा 'टेक वारी' उपक्रमाचा यशस्वी समारोप

माऊली... माऊली... च्या जय घोषात, टाळ–मृदंगाच्या नादात आणि हरिभक्तीच्या भक्तिरसात न्हायलेल्या वातावरणात मंत्रालयात पार पडलेल्या टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग विक या अनोख्या उपक्रमाचा सांस्कृतिक कार्यक्रमाने समारोप झाला.

(वरील सर्व कार्यक्रम टेक वारीच्या https://www.youtube.com या यू–ट्युब चॅनलवर; तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या फेसबुक पेजवर (https://www.facebook.com/MahaDGIPR) पाहता येतील.)

**(उपसंचालक (वृत्त), मावज, मंत्रालय, मुंबई.)**

# आपले खरे स्वरूप-प्रेम

केशव जाधव

जे खळांची व्यंकटी सांडो । भुता परस्परे जडो । मैत्र जिवांचे...... माऊलींच्या पसायदानातील परमेश्वराकडील हे एक महत्त्वाचे मागणे. सृष्टीतील सर्व जिवांचे परस्परावर मैत्र जडो, त्यांच्यात कटुता नको, असे मागणे सृष्टीच्या भल्यासाठी माऊलींनी मागितले आहे. खरंतर प्रेम हा जिवाचा स्थायी भाव. प्रत्येक जिवाच्या रोमारोमात प्रेम ओतप्रोत भरलेले आहे. पण तरीही माऊलींना हे मागणे मागावे लागते.



खरंच, विचार करण्यासारखी गोष्ट आहे. वेदांनी, उपनिषदांनी, संतांनी हीच गोष्ट वारंवार सांगितली असूनही हे असे का? विज्ञानाने आपल्या कुवतीप्रमाणे व सवडीने काही गुपिते उघडी केली. न्युटनच्या जडत्वाच्या नियमाने सिद्ध केले की, प्रत्येक वस्तूचा स्थायिभाव बाह्यशक्तीच्या प्रभावाशिवाय बदलत नाही. तद्वतच आपल्या पेशींचा प्रेममय स्वभाव सहजासहजी बदलत नाही; पण वारंवार आपण त्यांना क्रोधरूपी, अहंकारमय, द्वेषमूलक अशा कमांड दिल्या की त्या नाइलाजाने बदलू लागतात. त्यांच्यावर हे मनोनिर्मित संस्कार होतात आणि त्यामुळे या पेशींमध्ये हळूहळू बदल होतो व कालांतराने मूळ स्वाभाविक पेशींशी संघर्षाची भूमिका घेतात. हे या पेशींचे असंगत आचरण फार धोक्याचे असते. हे बंडखोर पेशींचे अनैसर्गिक आचरण म्हणजेच कॅन्सरसारखे आजार या निर्णयाप्रत आता मेडीकल सायन्सही पोहोचले आहे.

मानवातील ९९% आजार/रोग हे मनोकायिक स्वरूपाचे (Psychosomatic) असल्याचे सांगितले जाते. मनामध्ये उत्पन्न विचारातून जीवरासायनिक (Biochemical) प्रक्रिया होऊन त्याचे परिणाम पेशींवर होत असतात. ही बाब संतांनी आजवर साध्या शब्दात व बोलीभाषेत वारंवार सांगितली आहे. आज तज्ज्ञांनी, शास्त्रज्ञांनी त्यावर रिसर्च केला असून त्यावरील प्रबंध मेडीकल जर्नलमध्ये नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यामध्ये स्वाभाविक प्रेमाच्या विरूद्ध असंगत आचरण झाल्यास त्यामधून Auto emunity diseases ची निर्मिती होते. म्हणजेच प्रकृतीमध्ये अनैसर्गिक बिघाड झाल्याने प्रकृतीनेच निर्मित केलेले आजार. अर्थात, तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार...

तात्पर्य, सृष्टीतील प्रत्येक घटकाप्रति स्वाभाविक प्रेमभाव जागृत ठेवल्यास आपण स्वाभाविक निरोगी आयुष्य नक्की जगू शकतो.

(अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग.)




## गुपित

उरी बाळगून आहे मी गुपित मनातले
सांगू कोणा, कोणी भेटेना ।।

अगदी मुरलेल्या लोणच्यासारखे दिवसागणिक
त्याची गोडी वाढत आहे
देऊ कोणा, कोणी भेटेना ।।

मोरपिसाप्रमाणे ठेवले आहे मी
मनाच्या माझ्या पुस्तकात
पण दाखवू कोणा, कोणी भेटेना ।।

ठरविले अगदीच मी येईल तो एकदा तरी हळुवार
फुंकर घालुनी होईन मी त्याची परी
पण नक्की तो कोण आहे
आणि कोठे भेटेना ।।

उरी बाळगून आहे मी गुपित मनातले
सांगू कोणा कोणी भेटेना ।।

– सोनाक्षी पाटील
सामान्य प्रशासन विभाग

# गुणवंत अधिकारी/कर्मचारी गौरव

राज्य शासनाच्या तसेच केंद्र शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी ग्रामविकास विभागामार्फत राज्यभर प्रभावीपणे केली जाते. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी हे प्रकल्प आणि योजना अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रशासकीय व तांत्रिक कार्यक्षमतेसह कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांचे योगदान मोलाचे असून, त्यांच्या कर्तव्यपरायणतेचा आणि गुणवत्ता-कौशल्याचा ठसा या कार्यप्रक्रियेत अधोरेखित होतो.

प्रत्येक प्रकल्पाच्या यशामध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी व



कर्मचाऱ्यांची नियोजनक्षमता, नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य, तसेच लोकाभिमुख दृष्टिकोन यांचा मोठा वाटा असतो. त्यामुळेच शासनाने अशा गुणवंत अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि त्यांच्या कार्यगौरवाची दखल घेण्यासाठी सन २००५-०६ पासून गुणवंत अधिकारी/कर्मचारी गौरव योजना राबविण्यास प्रारंभ केला आहे. ही योजना ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय २ सप्टेंबर २००५ अन्वये सुरू करण्यात आली आहे.

या योजनेचा मुख्य उद्देश विभागामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासन स्तरावर गौरविणे, त्यांच्या कार्यास सामाजिक व शासकीय मान्यता मिळवून देणे; तसेच अशा आदर्श सेवकांच्या कार्यपद्धतीद्वारे इतरांना प्रेरणा देणे हा आहे. शासनाच्या कार्यसंस्कृतीत कार्यनिष्ठा, पारदर्शकता, जबाबदारी आणि सेवा भावनेला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिकोनातून ही योजना उपयुक्त ठरते.

या योजनेंतर्गत प्रत्येक आर्थिक वर्षात विभागीय स्तरावरून प्रस्ताव प्राप्त करून, गुणवत्तेच्या निकषानुसार मंत्रालयीन व क्षेत्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची स्वतंत्रपणे निवड समितीद्वारे तपासणी केली जाते. गुणवत्ताधिष्ठित प्रक्रियेअंती पात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांच्या कार्याचे औपचारिक व सामाजिक स्वरूपात कौतुक करण्यात येते.

या योजनेंतर्गत, सन २०२२-२३ या वर्षासाठी एकूण ३५ अधिकारी/कर्मचारी आणि सन २०२३-२४ या वर्षासाठी एकूण ३४ अधिकारी/कर्मचारी यांची गौरवासाठी निवड करण्यात आली आहे. हे अधिकारी व कर्मचारी मंत्रालय (खुद्द); तसेच विभागीय स्तरावर कार्यरत असून, त्यांनी शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि प्रकल्पांचे यशस्वी नियोजन, अंमलबजावणी आणि पर्यवेक्षण करून उत्कृष्ट कार्याचा आदर्श प्रस्थापित केला आहे.

विशेषतः मंत्रालयीन स्तरावरील खालील गुणवंत अधिकारी व कर्मचाऱ्यांची सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये गुणवत्तापूर्ण कार्याबद्दल प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला आहे:

नारायण किसन कुदळे - अवर सचिव
विवेक शिंदे - कक्ष अधिकारी
बाळू गभाले - सहायक कक्ष अधिकारी
अनिल गुरव - लिपिक-टंकलेखक

शिल्पा पुरव - कक्ष अधिकारी
शोभा संखे - निवडश्रेणी लघुलेखक
राकेश गायकवाड - सहायक कक्ष अधिकारी
मि. मु. लोध - शिपाई
ग्रामविकास विभाग, मंत्रालय (खुद्द) महाराष्ट्र शासन

वरील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अत्यंत निष्ठेने, कार्यक्षमतेने व व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून विभागाच्या कार्यात उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांचे हे कार्य अन्य कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणास्रोत ठरणारे आहे.

गुणवत्तापूर्ण कार्यासाठी देण्यात येणारा हा सन्मान ही केवळ व्यक्तिगत पातळीवरील मान्यता नसून, तो इतर अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी एक प्रेरणास्रोतदेखील आहे. अशा उपक्रमांमुळे प्रशासनात कार्यक्षमता, पारदर्शकता आणि जबाबदारी या मूलभूत तत्त्वांचा प्रसार होतो. सेवाभाव, उत्तरदायित्व आणि मूल्याधिष्ठित कार्यसंस्कृती निर्माण करण्याच्या दृष्टीने या सन्मान कार्यक्रमाचे विशेष महत्त्व आहे.

राज्य शासनास खात्री आहे की, गुणवंत अधिकारी/कर्मचाऱ्यांचा सन्मान केल्याने इतरांनादेखील उत्कृष्ट कार्य करण्याची प्रेरणा मिळेल. यामुळे ग्रामविकास विभागातील शासकीय यंत्रणा अधिक सक्षम, गतिमान आणि जनसामान्याभिमुख होईल.

**टीम आपलं मंत्रालय**

# राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा

**राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानातील २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षातील ३८ पुरस्कार्थींचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गौरव.**

## प्रशासनातील यशस्वी गोष्टींचे प्रमाणीकरण आवश्यक : मुख्यमंत्री



राज्यशासनामार्फत प्रशासनात गतिमानता आणण्यासाठी 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा' हे अभियान दरवर्षी राबविण्यात येते. या अभियानांतर्गत तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावरील स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी केलेली कार्यालये व सर्वोत्कृष्ट कल्पना / उपक्रम सुचवणाऱ्या शासकीय संस्था, अधिकारी व कर्मचारी यांना पारितोषिके देण्यात येतात.

या माध्यमातून नावीन्यपूर्ण तसेच लोकोपयुक्त संकल्पना राबवणाऱ्या अधिकाऱ्यांना गौरवान्वित करण्यात येते. कल्पक कार्यासाठी त्यांना प्रोत्साहित करून इतरांपर्यंत त्या कामाची माहिती पोहोचवणे अशा अभियानातून शक्य होते. उत्कृष्ट कार्याला सन्मानित करत यंत्रणेमध्ये एक सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासोबतच इतरांनाही अशाच पद्धतीने व्यापक दृष्टिकोनातून काम करण्यासाठी प्रेरित करणारे हे पुरस्कार निश्चितच यंत्रणेला आणि पुरस्कारर्थींनाही पुढील वाटचालीसाठी प्रेरणा देतात. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते २०२३-२४ व २०२४-२५ मधील उत्कृष्ट काम केलेल्या पुरस्कार्थींना प्रशस्तिपत्रक, धनादेश देऊन गौरवण्यात आले.

**टीम आपलं मंत्रालय**

पाक कला

**चिकनच्या अनेक रेसिपी प्रसिद्ध आहेत. त्यातल्या अगदी गावरान पद्धतीच्या भुजिंग आणि पोपटी यांची लज्जत काही न्यारीच. पोपटीला तर एक परंपराही लाभलेली आहे. भुजिंगचा जन्म खवैयांच्या जिभेचे चोचले पुरवण्यासाठी झाला आहे, तर पोपटीला परंपरेचे कोंदण आहे. दोघांच्या प्रक्रिया वेगळ्या आहेत. एकात तेलाचा भरपूर वापर तर दुसरी तेलविरहित. एक पटकन तयार होणारी, दुसरीला संयमाची जोड हवी. पोपटी करताना संयम नाही पाळला तर आपला पोपट नक्कीच होतो. दोघांमधील समान धागा म्हणजे निसर्गाच्या सान्निध्यात दोघांची लज्जत वाढते, मैफिल रंगते आणि खुमासदार होते.**

## भुजिंग



भुजिंगच्या निर्मितीची कथा मजेशीर आहे. दारू पिणाऱ्यांना सोबत चटकदार खायला काय द्यावं याच्या संशोधनातून चिकन भाजणे, तळणे या प्रक्रियेतून पोह्याच्या संमिश्र सोबतीने आगाशी, विरार येथे हा पदार्थ प्रथम निर्मिला गेला. चिकनला पोह्याची जोड काही आगळीवेगळी आहे. प्रथम चिकन, बटाट्यांच्या फोडींना जिरा, हळद, धणे, मीठ लावून मॅरिनेट करायचे. लोखंडी सळईत चिकन, बटाटे याप्रमाणे गुंफायचे. कोळशाच्या भट्टीवर खरपूस भाजायचे.

वरील भाजण्याची प्रक्रिया झाल्यावर कांदे, वरील मॅरिनेटेड चिकन, बटाटे व खडे गरम मसाले, हिरवी मिरची, लसूण यांचे जाडसर मिश्रण हंडीतील तेलात परतायचे. हंडीवर थाळी ठेवून १० ते १५ मिनिटानंतर त्यात पोहे परतायचे. काही जणांना पोहे आवडत नसल्यास, पोहे नाही वापरले तरी चालतील.

भुजिंगला भाजण्यासाठी भट्टीची गरज लागत असली तरी हे काम दोन विटांवर खाली कोळसे जाळूनही करू शकता. घरी हे शक्य नसते त्यावेळी चिकन थेट गॅसवर भाजता येईल. कोळशावर भाजल्या जाणाऱ्या चिकनची नैसर्गिक चव त्याला लाभणार नसली तरी, जिभेचे चोचले थोड्या प्रमाणात नक्कीच शमले जातील. चिकनला कोणते मॅरिनेट वापरायचे याचा निर्णय सर्वस्वी तुमचा. अट एकच प्रथम चिकनला भाजणे मग त्याला तेलात परतणे. एकदा तोंडाला लागलं की, त्याचा फडशा पडला म्हणूनच समजा.

## पोपटी

पोपटी हा पदार्थ रायगड परिसरात साधारण थंडी सरत आली की म्हणजे साधारणतः फेब्रुवारी महिन्यात करण्यात येतो. याचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण प्रक्रियेत जराही तेल वापरत नाहीत. म्हणजे डाएटबद्दल जागृत असणाऱ्या लोकांना पर्वणीच. चिकनचे तुमच्या आवडीचे मॅरिनेशन, वालाच्या शेंगा, बटाटे, अंडी आणि भांबुर्डीचा पाला मातीच्या मडक्यात बंद करायचा. फक्त जाळावर चिकन शिजवायचे. चिकन जितकं जास्त वेळ मॅरिनेट केलेलं असेल तितकं लवकर शिजतं. गप्पा मारत झोंबऱ्या थंडीत निसर्गाच्या सान्निध्यात केलेली मेजवानी म्हणजे अवर्णनीय स्वर्गीय सुखाचा आनंद.

भांबुर्डीचा पाला नदीकिनाऱ्यावर विपुल मिळतो. मातीच्या मडक्यात प्रथम भांबुर्डीचा पाला, त्यावर मॅरिनेट केलेलं चिकन (१ किलो), वालाच्या शेंगा (२ किलो), अंडी (१२), बटाटे (१/२ किलो) असे थर रचायचे. वरून मीठ, ओवा भुरभुरायचा आणि मग वरून भांबुर्डीचा पाल्याने मडक्याचे तोंड व्यवस्थित बंद करून विटांवर मडक्याच्या तोंडाच्या दिशेने रचायचे. भवताली सुक्या गवताचा, सुकलेल्या फांद्यांचा जाळ करायचा. साधारणता चिकन एक तासात शिजते, अर्थात जाळाची धग किती आहे यावर ते अवलंबून आहे. मडके काढताना कपड्यात धरून व्यवस्थित काढावे. पाला वेगळा करून सर्व पदार्थ मोठ्या परातीत किंवा केळीचे मोठे पान असल्यास त्यावर काढायचे आणि मग कधी चिकन तर कधी शेंगा हुडकून काढत गप्पांच्या मैफिलीत अन् बोचऱ्या थंडीला शह देत त्याचा फडशा पाडायचा.

चिकन कबाब, चिकन टिक्का, चिकन ६५ असे चिकनचे अनेक लज्जतदार अवतार असले, तरी या मातीतल्या भुजिंग, पोपटीची मजा, सर त्याला नाही. निसर्गाच्या सान्निध्यात आस्वाद घेत पोपटीची लज्जत काही आगळी वेगळीच, त्याला रंगणाऱ्या गप्पांची जोड असते. तर भुजिंगमध्ये स्वत्वात लीन होत जिव्हेला अन् देहाला स्वर्गीय आनंद देण्याची अविरत गोडी आहे.

शाकाहारी मंडळींनी नाराज होण्याचं कारण नाही. प्रक्रिया वरीलप्रमाणेच आहे. चिकन, अंडी बाजूला काढायची त्याऐवजी सहज मॅरिनेट होणाऱ्या आणि लज्जत वाढवणाऱ्या शेंगा, बटाटे, कंदमूळ (रताळे, काटेकनगे इ.) किंवा आपले आवडीचे पदार्थ वापरून शाकाहारी भुजिंग, पोपटी तयार करायची. हे दोन्ही पदार्थ गरम असतानाच चाखण्यात मजा आहे. नुकतेच हंडीतून काढलेले हे पदार्थ भौतिक, आत्मिक सुखाची प्रचिती एकाच वेळी देतात. पोपटी साधारण थंडीमध्ये खाण्याचा मेनू असला, तरी हाडाचा खवय्या थंडीसाठी थोडाच थांबणार आहे. याची देही, याची डोळा सुख चाखायचे असेल, तर मग वाट कसली पाहता. घ्या भुजिंग, पोपटीचे नाव आणि लागा खवय्येगिरीला.



# TECH - वारी

## Maha - Tech Learning Week


**(टेक-वारी कार्यक्रम https://www.youtube.com या यू-ट्युब चॅनलवर; तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या फेसबुक पेजवर (https://www.facebook.com/MahaDGIPR) पाहता येतील.)**

---

# कर्मयोगी भारत

लोकहितं मम करणीयम्

**www.igotkarmyogi.gov.in**

















# लिहिते व्हा...

## आपलं मंत्रालय



माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित 'आपलं मंत्रालय' (डिजिटल आवृत्ती) तयार करण्याचे नियोजित आहे. मंत्रालयातील विविध विभागांचे अधिकारी–कर्मचारी यांनी आपल्या कथा, कविता, स्वानुभव, पाककला, भ्रमंती, व्यंगचित्रे, विशेष छायाचित्रे; तसेच विभागातील पदोन्नती, निवृत्ती याबद्दल 'आपलं मंत्रालय' या गृहपत्रिकेसाठी लेखन साहित्य *(युनिकोड वर्ड फाईल स्वरूपात)* खालील दिलेल्या ई–मेलवर पाठवावेत.

**आपलं मंत्रालय**

प्रकाशने शाखा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
१७ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई.
ई–मेल : **aaplemantralay@gmail.com**

**Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR**
**Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR**